शनिवार, 27 ऑगस्ट 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 30
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 27 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-30 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5



## भारताचे सरन्यायाधीश एन.व्ही. रमणा सेवानिवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश एनव्ही रमणा यांच्या कार्यकाळाचा आजचा शेवटचा दिवस आहे. यानिमित्ताने शुक्रवारी एन.व्ही. रमणा यांनी कार्यपीठाला संबोधित केले. १६ महिन्यांत मी केवळ ५० दिवस प्रभावी आणि पूर्णवेळ सुनावणी करू शकलो आहे. सरन्यायाधीश रमणा यांनी त्यांच्या कार्यकाळात लवकर सुनावणीसाठी सूचीबद्ध प्रकरणे घेण्यावर लक्ष केंद्रित करू न शकल्याबद्दल त्यांच्या शेवटच्या कामकाजाच्या खंडपीठात माफी मागितली. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, मला माफ करा. त्यांच्या या विधानामागील अर्थ म्हणजे कोर्टरूममध्ये मागील ३ महिन्यांत पूर्णपणे फिझिकल सुनावणी दरम्यान झालेल्या सुनावणीबाबत होता, असे मानले जात आहे. कारण, त्यांच्या कार्यकाळात बहुतांश वेळा व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी झाली. सरन्यायाधीश रमणा म्हणाले की, मी खटल्यांची यादी आणि पोस्टिंगवर अधिक लक्ष केंद्रित करू शकलो नाही, याबद्दल मला खेद आहे.

# काँग्रेसमधून गुलाम नबी 'आझाद'

## जम्मू-काश्मीरमधील पाच आमदारांनीही ठोकला पक्षाला रामराम


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी आज काँग्रेस पक्षातील आपल्या सर्व पक्षीय पदांचा राजीनामा दिला आहे. त्यांनी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिला. ते दीर्घकाळापासून पक्षावर नाराज असल्याची चर्चा होती. काँग्रेसने त्यांना राज्यसभेवर पाठवले नसल्याने त्यांची नाराजी अधिकच वाढल्याचे सांगितले जात होते. काही दिवसांपूर्वी आझाद यांनी काश्मीरमधील पक्षाच्या प्रचार समितीचा राजीनामा दिला होता. त्यानंतर सोनिया गांधींना उद्देशून लिहिलेल्या आपल्या पत्रात आझाद यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा दिला.**

गुलाम नबी आझाद हे पक्षावर बराच काळ नाराज होते. काँग्रेसच्या G-23 बंडखोर गटाचे महत्त्वाचे सदस्य आझाद यांनी काँग्रेसमधील बदलांबाबत सोनिया गांधींना पत्रही लिहिले होते. या पत्रानंतर बराच गदारोळ झाला होता. आझाद यांनी सोनिया गांधी यांना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा उल्लेख केला आहे. त्यांनी लिहिले की, त्यांच्या विद्यार्थी जीवनात त्यांच्यावर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सुभाष चंद्र बोस आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांचा प्रभाव होता. १९७५-७६ मध्ये संजय गांधींच्या विनंतीवरून त्यांनी जम्मू-काश्मीर युवक काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारले आणि कुठलाही स्वार्थ न ठेवता अनेक दशके पक्षाची सेवा केली.

**५ आमदारांसह माजी मंत्र्यांचाही राजीनामा**

दरम्यान गुलाम नबी आझाद यांच्या राजीनाम्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. जम्मू-काश्मीरमधील काँग्रेसच्या ५ आमदारांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. याशिवाय जम्मू-काश्मीर काँग्रेसच्या दोन नेत्यांनीही आझाद यांच्या समर्थनार्थ राजीनामा दिला आहे. अशाप्रकारे



जम्मू-काश्मीरमधील काँग्रेसच्या एकूण सात नेत्यांनी आझाद यांच्या समर्थनार्थ पक्ष सोडला आहे. राजीनामा देणाऱ्यांमध्ये माजी काँग्रेस मंत्री आरएस चिब आणि जीएम सरूरी, माजी आमदार मोहम्मद अमीन भट, माजी आमदार नरेश गुप्ता आणि पक्षाचे नेते सलमान निजामी यांचा सामावेश आहे. आझाद यांनी नवीन पक्ष स्थापन केला तर त्यांच्यासोबत जाणार, अशी भूमिका माजी आमदारांनी व्यक्त केली आहे.

**आझाद नवीन पक्ष स्थापन करणार**

गुलाम नबी आझाद यांनी राजीनामा दिल्यानंतर ते भारतीय जनता पार्टीत प्रवेश करतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. पण या सर्व चर्चांना गुलाम नबी आझाद यांनी तूर्तास पूर्णविराम दिला आहे. आपण जम्मू काश्मीरमध्ये स्वतःचा राजकीय पक्ष काढणार असल्याचे आझाद यांनी जाहीर केले आहे.

### काँग्रेसवर वैयक्तिक मालकी नाही

**पृथ्वीराज चव्हाण स्पष्टच बोलले**

मुंबई : काँग्रेस पक्ष वैयक्तिक मालकीचा नाही. निवडणूक आयोगाकडे घटनेची नोंद आहे. गांधी कुटुंबाने दिले. त्यात समाधान मानले पाहिजे. ही मुघल सलतन आहे का? लोकशाही पद्धतीने नेमणुका होत नाही याचा गांभीर्याने विचार करणार आहोत का? सोनिया गांधी होत्या विजय मिळत गेला. आमची चूक झाली याआधी आम्ही हे बोलायला हवे होते. निवडणूक घेऊन जे निवडून येईल ते मान्य केले पाहिजे. एकाच कुटुंबातील जास्त नको. मग राहुल गांधी कोणत्या कुटुंबातील आहेत. काँग्रेस पक्षाला वाचवायचे असेल निवडणूक घ्यायला हवी अशी मागणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. गुलाब नबी आझाद यांच्या राजीनाम्याचे दुःख आहे. अनेक वर्ष ते काँग्रेससोबत होते. आम्ही गोपनीय पत्र सोनिया गांधींना लिहिले. दुर्दैवाने हे पत्र माध्यमांमध्ये लिक झाले. मोदी-शाह यांच्याविरोधात लढण्यासाठी काँग्रेसला पूर्णवेळ अध्यक्ष हवा अशी मागणी आम्ही केली होती. राहुल गांधी तयार असतील तर ठीक अन्यथा निवडणुका घेऊन अध्यक्षांची नेमणूक करावी असे आम्ही म्हटले होते. काँग्रेसच्या पराभवाची कारणे काय याचे आत्मचिंतन करण्याची मागणी होती. काँग्रेसच्या संविधानात्मक रचनेनुसार पक्षांतर्गत निवडणूक होणे गरजेचे आहे. ते झाले नाही असे चव्हाणांनी म्हटले.

# देशाचा जीडीपी 7.4 टक्के दराने वाढणार, पुढच्या वर्षी हा वेग कायम राहणार : सीतारमण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशातील वाढती महागाई आणि जीडीपी दरावरुन विरोधत सातत्याने केंद्र सरकारवर टीका करत असतात. पण, आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाच्या जीडीपीबाबत महत्वाची माहिती दिली. निर्मला सीतारमण म्हणाल्या की, या आर्थिक वर्षात देशातील जीडीपी 7.4 टक्के दराने वाढेल आणि पुढील आर्थिक वर्ष 2024 मध्येही हा दर काम असेल. एफई बेस्ट बँक्स अवॉर्ड्स शोमध्ये बोलताना सीतारमण यांनी ही माहिती दिली.

**पुढील दोन वर्षात वेगाने वाढ होणार**

यावेळी त्या म्हणाल्या की, येत्या दोन आर्थिक वर्षांत भारताचा विकास दर सर्वाधिक वेग पकडेल असेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेने व्यक्त केला आहे. रिझर्व्ह बँकेनेही अशाच प्रकारचा अंदाज व्यक्त केला आहे. जागतिक अर्थव्यवस्था संकटातून जात आहे, अशा परिस्थितीत सावध पाउले टाकावी लागतील. जागतिक अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला आहे, ज्यामुळे निर्यात क्षेत्राला अनेक आव्हानांचा सामना करावा लागेल. पण, सरकार अशा सर्व आव्हानांचा सामना करण्यावर काम करत आहे, अशी



माहिती त्यांनी दिली.

**मोफतच्या योजनांमुळे भार वाढणार**

सरकारच्या मोफत योजनांवर बोलताना त्या म्हणाल्या की, एखाद्या मोफत योजनेची घोषणा करण्यापूर्वी सरकारने विचार करावा की, याचा इतर क्षेत्रावर परिणाम पडणार नाही. जे पक्ष निवडणुकीपूर्वी मोफत योजनांची आश्वासने देत आहेत, त्यांनी सत्तेत आल्यानंतर आपल्या बजेटवर लक्ष द्यायला हवे, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी आपवर लगावला.


# बंडखोरांचा समाचार घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या ३ मोठ्या सभा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेनेला सावरण्यासाठी, शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य फुलवण्यासाठी आदित्य ठाकरेंच्या पाठोपाठ पक्षप्रमुख उद्धव ठाकरेही मैदानात उतरणार आहेत. शिवसेनेत मोठी पडझड झाल्यानंतर पक्ष सावरण्यासाठी युवा नेते आदित्य ठाकरे कामाला लागले आहेत. आदित्य यांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळत असताना आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही शड्डू ठोकला आहे. बंडखोरांचा समाचार घेण्यासाठी येत्या महिनाभरात उद्धव ठाकरे यांच्या तीन मोठ्या पार पडणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात एक लढाई सुरु असताना आता जनतेच्या न्यायालयात जाऊन उद्धव ठाकरे न्याय मागणार आहेत. माझे नेमके चुकले काय? मी बंडखोरांना काय कमी केले? असे सवाल विचारुन उद्धव ठाकरे बंडखोरांवर कडाडून प्रहार करतील तर जनतेला भावनिक सादही घालतील.

महाराष्ट्रातील राजकारणात उद्धव ठाकरे विरुद्ध एकनाथ शिंदे असा संघर्ष होत आहे. शिवसेनेच्या ४० आमदारांनी एकनाथ शिंदेंसोबत जाण्याचा निर्णय घेतला. बंडखोरी केल्यानंतर आता शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी सरकार स्थापन केले. मंत्रिमंडळाचा विस्तारही झाला. आता उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे आपला ढासाळलेला पक्ष वाचवण्यासाठी मैदानात उतरले आहेत. आदित्य ठाकरे शिवसंवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यव्यापी दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्याला जनतेचाही मोठा पाठिंबा मिळत आहे. त्याशिवाय आता उद्धव ठाकरेंनीही राज्यव्यापी महाप्रबोधन यात्रेची घोषणा केली आहे.

### सध्या समीकरणांची जुळवाजुळव



**महाराष्ट्रात फिरणार आहे म्हणजे माझ्या घरातच फिरणार आहे. तूर्त मातोश्रीवरची गर्दी कमी केली. मोजक्या लोकांना बोलावतो. संघटनेची बांधणी करतो. सध्या सणवार सुरु होतायेत. दसऱ्याच्या अलीकडे पलीकडे महाराष्ट्र दौरा सुरु करेन. पण त्याअगोदर मुंबईतल्या पदाधिकाऱ्यांचा नेस्को मैदानावर मेळावा, नंतर शिवाजी पार्कावर दसरा मेळावा आणि नंतर महाराष्ट्र दौरा करेन. सध्या त्याच अनुषंगाने समिकरणांची जुळवाजुळव करतोय, असे उद्धव ठाकरेंनी आज पत्रकार परिषदेत सांगितले.**



# पंतप्रधान नरेंद्र मोदींची जादू कायम

## लोकप्रिय नेत्यांच्या यादीत पुन्हा टॉपवर, जो बायडन पिछाडीवर

आधुनिक केसरी न्यूज


नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतराष्ट्रीय पातळीवर लोकप्रिय नेत्यांच्या यादीत पहिले स्थान पटकावले आहे. मॉर्निंग कन्सल्ट सर्वे या कंपनीने केलेल्या सर्व्हेक्षणात नरेंद्र मोदींना ७५ टक्के रेटिंग मिळाले आहे. नरेंद्र मोदी यांनी अमेरिका, जर्मनी आणि जपानच्या नेत्यांना पिछाडीवर टाकले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७५ टक्के रेटिंगसह पहिले स्थान पटकावले आहे. मोदी यांच्यानंतर मेक्सिकोचे अध्यक्ष आंद्रेस मॅन्यूएल लोपेझ ओब्रॅडोर यांचा क्रमाक आहे. तर, तिसऱ्या स्थानावर इटलीचे पंतप्रधान मारिओ द्राघी यांचा क्रमांक आहे. मेक्सिकोच्या अध्यक्षांना ६३ टक्के तर इटलीच्या पंतप्रधानांना ५४ टक्के रेटिंग मिळाले आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्या स्थानावर आहेत. तर, अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन हे ४१ टक्के रेटिंगसह पाचव्या स्थानावर आहेत. २२ देशांच्या यादीत पुन्हा एकदा नरेंद्र मोदी एकदा टॉपवर आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडेऊ हे सहाव्या स्थानावर आहेत. तर, जपानचे पंतप्रधान फुमिओ किशीदा ३८ टक्के रेटिंगसह सातव्या स्थानावर आहेत.

मॉर्निंग कन्सल्ट ही संस्था जगभरातील सरकारे आणि नेत्यांच्या कामगिरीचा आढावा आणि सर्व्हेक्षण करुन रेटिंग जाहीर करते. मॉर्निंग कन्सल्ट ही संस्था ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया, ब्राझील, जर्मनी, भारत, मेक्सिको, नेदरलँडस्, दक्षिण कोरिया, स्पेन, स्वीडन आणि अमेरिका या देशांमध्ये कार्यरत आहे. मॉर्निंग कन्सल्ट ही संस्था जगभरात दररोज २० हजारहून अधिक मुलाखतीचे आयोजन करते. रेटिंग जाहीर करताना या संस्थेकडून सात दिवसांच्या सरासरी आकडेवारीचा आधार घेतला जातो. अमेरिकेत जवळपास ४५ हजार जणांची मते जाणून घेतली जातात. तर, इतर देशांमध्ये ५०० ते ५ हजार जणांची मते नोंदवून घेतली जातात.

नोव्हेंबर २०२१ आणि जानेवारी २०२२ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकप्रिय नेत्यांच्या यादीत पहिले स्थान पटकावले होते. भारतामध्ये या संस्थेकडून ऑनलाईन मुलाखतींचे आयोजन करण्यात येते. मॉर्निंग कन्सल्ट या संस्थेकडून सदस्य देशातील स्थानिक भाषांमध्ये सर्वेक्षण करण्यात येते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सारे जहाँ से अच्छा ...

आधुनिक केसरी

हिमालय, दक्षिणेतले समुद्रकिनारे, पांढऱ्या ढगांनी आच्छादिलेलं आकाश या साऱ्या साऱ्यांचं मी मनसोक्त दर्शन घेत होतो. अंतरात साठवीत होतो. आकाशात अनेक नक्षत्र, तारे दिसत होते. पण मला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे शब्द आठवू लागले -

**नभी नक्षत्रे बहुत एक परी प्यारा**
**मज भरतभूमिचा तारा**

आणि माझा ऊर अभिमानाने भरून आला. परदेशात असणाऱ्या सावरकरांना म्हणूनच भारतमातेची ओढ लागली असावी. म्हणूनच भूमातेचे चरण धुणाऱ्या त्या सागराला त्यांनी म्हटले, ' ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला. '

मी यानातील अंतराळवीरांना म्हटले माझे विश्वदर्शन, भारतदर्शन आता पूर्ण झाले आहे. मला आता माझ्या प्राणप्रिय असलेल्या पृथ्वीवर आणि त्याहून प्राणप्रिय असलेल्या मातृभूमीवर घेऊन चला. आणि यानाचा परतीचा प्रवास सुरु झाला. अंतराळातून मला पृथ्वी आणि भारतमातेचे जे दर्शन घडले होते, ते दिव्य होते. त्यात देशांच्या, भाषेच्या, जातीधर्माच्या कोणत्याही सीमारेषा मला आढळल्या नाहीत. आणखीही एका सत्याची मला जाणीव झाली. आपण जसजसे वर जातो तसतशा या सीमारेषा पुसट होत जातात. जसजसे खाली येतो, तसतशा या सीमारेषा स्पष्ट होत जातात. अंतराळातून मला माझा भारत ' सारे जहांसे अच्छा ' दिसत होता. मला तो तसाच हवा असेल तर मला जाती, प्रांत, भाषा या सगळ्यांच्या भिंती पार करून वर जायला हवे. विशाल व्हायला हवे. स्वार्थी, क्षुद्र विचारांच्या पलीकडे जाऊन माझ्या जाणिवा विशाल करायला हव्या. मला नुसता तिरंगा लावून भागणार नाही. तीन रंगांची ही मशाल माझ्या अंतरात सतत तेवती हवी . अभिमानाने तिरंगा तर फडकवायला हवाच पण त्याची शान तेव्हाच राहील जेव्हा शाळेत रोज म्हटल्या जाणाऱ्या प्रतिज्ञेतले ' भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत ' हे शब्द प्रत्यक्षात येतील. माझ्या देशातील प्रत्येक व्यक्ती सन्मानाने आपले आयुष्य व्यतीत करू शकेल. माझ्या देशातल्या माय भगिनींकडे जेव्हा आम्ही एक स्त्री म्हणून नव्हे तर एक व्यक्ती म्हणून, एक माणूस पाहू. मला सेनापती बापट यांच्या कवितेतल्या ओळी आता आठवत आहेत.

हा देश माझा याचे भान जरासे राहू द्या रे...

हे एवढे भान तरी प्रत्येकाने राहू द्या. हे भान असले तर प्रत्येक वेळी कोणतेही काम करताना माझ्या देशाचा विचार माझ्या मनात आधी येईल. मी जे काही करतो ते माझ्या देशाच्या दृष्टीने, समाजाच्या दृष्टीने चांगले आहे ना हा विचार करूनच मी ते करीन. असे झाले तरच राष्ट्रगीतात म्हटल्याप्रमाणे ' भारत भाग्यविधाता ' होईल. ' वंदे मातरम ' नुसती घोषणा नको. तो आदर, ते प्रेम मनात हवे. आचरणात यायला हवे. तरच साने गुरुजींच्या स्वप्नातला ' बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो ' प्रत्यक्षात येईल. आपणा सर्वांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या अमृतमय शुभेच्छा !



## आनंदी पहाट

# चमत्काराशिवाय नमस्कार नाही

आधुनिक केसरी

अलीकडच्या काळांत आपल्याला स्वयंघोषित महाराज आणि त्यांचे विविध किस्से बघायला, ऐकायला मिळत आहेत. ह्या बुवाबाजी करणाऱ्या महाराजांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे आपल्या सर्वांना ज्ञात आहेच. त्यांच्या एखाद्या जादुई चमत्काराच्या कारणाने त्यांचे अनेक भक्त तयार होतात. दिवस-रात्र त्यांच्या सेवेत राहतात, त्यांच्या राहण्या-खाण्याची स्वखर्चाने पंचतारांकित व्यवस्था देखील करतात. त्यांचे देश-विदेशातील फिरणे असेल, पंचतारांकित हॉटेलमध्ये वास्तव्य करणे असेल, विमानाचा प्रवास असेल; तेव्हा त्यांच्या सेवेसाठी तत्पर असणारे काही निस्सीम भक्तगण सदैव त्यांच्या दिमतीला असतात. केवळ एखाद्या हातचलाखीच्या कारणामुळे पदोपदी नमस्कार करणारा भक्तगण लाखांच्या संख्येने आशीर्वाद घेण्यासाठी, ह्या स्वयंघोषित महाराजांच्या चरण तीर्थासाठी आतुर झालेला असतो. चमत्काराच्या कारणाने केलेला नमस्कार त्यांना अधिक लाभदायक वाटत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

चमत्काराशिवाय नमस्कार नाही असं जरी चित्र असलं, तरीही नमस्काराचा चमत्कार आपण नेहमीचा अनुभवत असतो.

"गरजवंताला अक्कल नसते" ह्या उक्तीप्रमाणे आपल्या कामासाठी दिवसभरांत अनेकांना, त्यांची पात्रता आणि विशेष जरुरी नसताना देखील, नमस्कार करत फिरावे लागते. एखादे काम करवून घेण्यासाठी, विशेषतः सरकारी कचेऱ्यांत शिपायाला देखील साहेब म्हणावे लागते आणि तो शिपाई देखील आपल्या नमस्काराचा चमत्कार कसा होऊ शकतो, ते आपल्याच अधिकारवाणीने, कोणताही अधिकार नसतानाही, सांगत फिरत असतो. रस्त्यावरील एखाद्या चौकात उभ्या असलेल्या पोलीसांनी आपली गाडी आडवली. पुढे काही होण्यापूर्वी आपण केलेला नमस्कार देखील निश्चितच चमत्कार घडवून आणतो. मनोभावे केलेला नमस्कार आपल्या मनाला उभारी, बळ देतो, आत्मविश्वासाची जाणीवही करून देतो, शुभेच्छा देतोच आणि कालांतराने यशप्राप्तीही देतो. नमस्काराने निर्माण होणारं सकारात्मक वातावरण हे निश्चितच आनंद देत असते.



आधुनिक केसरी

## चंदनाची उटी | जीव झाला ||

भेगाळली धरा | पावसाची आस ||
तैसी जीवा खास | ओढ तुझी ||१||

संसारी लागेना | राऊळी रमेना ||
हुरहुरी मना | चैन नाही ||२||

अनाथ लेकरू | शोधतो निवारा ||
लटका पसारा | माया मोह ||३||

दांभिक हुंदका | कोरडा उमाळा ||
शोधतो जीव्हाळा | वेडा जीव ||४||

कंठाशी ह्या प्राण | आले विठुराया ||
तुजवीन छाया | कोण देई ? ||५||

तुझ्या चरणाशी | मारता मी मिठी ||
चंदनाची उटी | जीव झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी


**दद्याद्दयानुपवनोद्रविणाम्बुधाराम्**
**अस्मिन्नकिञ्चनविहङ्गशिशौविषण्णे ।**
**दुष्कर्मघर्ममपनीयचिरायदूरं**
**नारायणप्रणयिनीनयनाम्बुवाहः ॥८॥**

भगवान नारायणाच्या प्रिय अशा लक्ष्मीचा नेत्ररूपी मेघ दयारूपी अनुकूल पवनाने प्रेरित होऊन दुष्कर्मरूपी घामाला नेहमीकरिता दूर सारून विषादात पडलेल्या माझ्यासारख्या दीनरूपी चातकावर धनरूपी जलधाराची वृष्टी करो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# सगुणभजन

आधुनिक केसरी

परंतु असा प्रत्यय येऊन सुद्धा ज्ञानी पुरूषाला
देहाचे नित्यकर्म, त्याच्या प्राथमिक गरजा व त्या सद् ग्रहस्थाचा लोकव्यवहार काही सुटत नाही, कारण आपण प्रापंचिक माणंसं आहोत.

याचा अर्थ असा की,ज्ञानी पुरूषांच्या देहाची हालचाल अज्ञानी पुरूषांच्या देहाच्या हालचाली सारखीच असते. त्यात ज्ञानी पुरूषाने सगुणाचे भजनपूजन केले तर बिघडले कुठे?खरा फरक अंतर्यामी असतो. ज्ञानी पुरूष सगुणोपासना करतो त्याच्या भजनात भ्रमाचा लवलेशही नसतो.तर अज्ञानी पुरूषाच्या सगुणभजनात नुसता भ्रमचं भरलेला असतो. भीतीनें देवाची उपासना करणे किंवा त्याने प्रपंचात मदत करावी म्हणून ती करणे यापेक्षा आणखी भ्रम कोणता. आपण जन्माला आल्यापासून पाणी प्यायला लागते,जेवायला लागते,घरदार लागते भावंडे लागतात संसार लागतो हे सर्व लागते तर हे जसे काही चुकत नाही. आपल्या लोकांचे भले व्हावे ही जशी आपली संस्कृती आहे तशी सगुणोपासना न करता जीवन जगणे भजनपूजन न करता जीवनातील बाकीचे कर्म करत रहाणे याला ज्ञान म्हणत नाही. आपण जीवन जगत असताना हरेक कर्म करतो.पण,देवधर्म करायचा म्हणले की नाके मुरडतो हे तर अज्ञान आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


21 व्या ओवीत समर्थ म्हणतात की मी ज्या कुळात जन्माला आलो त्या कुळाचा कुलस्वामी श्रीराम आहे. तो माझं भरणपोषण करतो. "आम्ही काय कुणाचे खातो आमचा राम आम्हाला देतो."या ओळीवरून समर्थांच्या रामभक्तिची कल्पना येते. "मी फक्त शहाणा "अशा देहबुध्दीच्या माणसाचा विकास कधीच होत नाही.आपण तर परमार्थ साधत जीवन जगणारी माणसं आहोत.परमार्थ हा अतींद्रिय अनुभवाचा प्रांत आहे. आपल्याला परमार्थ समजत नाही तर आपण तो ज्ञानी पुरूषा कडून समजून घेतला पाहिजे. ज्ञानी लोक जे सांगतील त्या वर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांना विनाकारण दोष लावून नाना विकल्प मनात आणून आपली श्रध्दा भंग होउ देऊ नये. "मला सर्व समजते" ही भावना परमारर्थात अती घातक ठरते. अशा बुद्धीहीन माणसाचे होते काय तर धड ज्ञान नाही धड भक्ति नाही आहे तो केवळ असार होय.थोर पुरूषाच्या ज्ञानी पुरूषशाच्या मनातून उतरणे हीअगदीच दुर्दैवी घटना आहे. राजपदाचा हक्क असणारा एखादाच राजपुत्र आपल्या दुराचाराने तो हक्क गमावून बसतो आणि दुर्दैवी बनतो. मी मोठा आहे मी आत्मज्ञानी असल्याची खुण सतत मिरवत रहाणे हे आत्मज्ञान .नसून देहाभिज्ञान आहे. देहाभिज्ञानाची सुप्त कल्पना त्याच्या अतर्यामी सतत वास करत असते।

# ।। आपण भगवंतासाठी आलो आहोत ।।

आधुनिक केसरी न्यूज

आपण स्वप्नात असतो तोपर्यंत स्वप्नच खरे आहे असे वाटते. त्याचप्रमाणे जोपर्यंत भगवंताचे सत्यत्व आपल्याला नीट समजत नाही, तोपर्यंत हे सर्व मिथ्या असणारे जग आपण भ्रमाने सत्यच मानीत असतो. जे चिरकाल राहते तेच खरे सत्य होय. आपला मार्ग चुकला आहे एवढे जरी समजले तरी सत्याकडे जाता येते. मन विषयाकडे लावून नाही समाधानाचा अनुभव येणार. समाधान जिथे भंगते तो मार्ग खास चुकीचा आहे. मुंगळा गुळाच्या खड्याला चिकटतो, मान तुटली तरी सोडीत नाही. त्याचप्रमाणे, आपण विषयसुख सोडीत नाही, याला काय करावे? जे अनुभवाने खरे शहाणे होतात ते या विषयसुखाचा त्याग करतात; आणि ज्यांची ही विषयाची आसक्ती सुटली त्यांनाच ते मिथ्या आहे हे प्रत्ययाला येते.

आपले समाधान का बिघडते ? आज आहे त्यापेक्षा निराळे असावे असे वाटते म्हणून ! जो जिन्नस जिथे ठेवला आहे ती जागा सोडून आपण त्रिभुवन जरी शोधले तरी तो सापडत नाही; त्याचप्रमाणे ह्या वस्तूमध्ये समाधान नाहीच त्यामध्ये कितीही शोधले तरी ते आपल्याला मिळत नाही.



समाधान फक्त भगवंताजवळ आहे. खरे म्हणजे आपली वृत्ती परिस्थितीत अडकलेली असल्यामुळे ती स्थिर राहात नाही; म्हणून आपल्याला समाधान नाही. मनुष्य आहे त्या स्थितीला कंटाळून, सुख मिळावे यासाठी जे करायला जातो ते शेवटी दुःखाचेच होते. म्हणून, आहे त्या परिस्थितीत समाधान मानायला शिकावे.

आपण ज्या कार्यासाठी आलो, ते कार्य झाले की समाधान होते. मग जोपर्यंत आपल्या कृतीने आपल्याला समाधान होत नाही तोपर्यंत, आपण त्या कार्यासाठी आलो नाही असे म्हणायला काय हरकत आहे? आपण भगवंतासाठीच आलो आहोत आणि त्याच्या प्राप्तीमध्ये आनंद आहे. जगातली कोणतीही दृश्य वस्तू आपल्याला मनाचे स्वास्थ्य देऊ शकत नाही, किंवा ते नेऊ शकत नाही. मन भगवंताजवळ गुंतेल तेव्हाच स्वास्थ्य मिळेल. त्याकरिता नेहमी भगवंताचे नामस्मरण करावे, त्याचे गुणवर्णन ऐकावे, त्याच्याशिवाय दुसरी गोष्ट काढूच नये. मिथ्या समजून प्रपंच करावा आणि भगवंताचे होऊन राहावे. नामाच्या उलट सांगतील त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. कोरडा वेदान्त ऐकू नये. प्रत्येक नामागणिक भगवंताची आठवण होते. म्हणून नामच सर्वस्व मानावे. नामात काय आहे हे, ते घेतल्यानेच सर्व काही कळून येते. तीर्थक्षेत्रात किंवा संतांच्याकडे जाऊन वस्तू मिळवायची नसून समाधान मिळवायचे असते, आणि हे नामस्मरणाच्या योगानेच घडून येते.

**आजचे बोधवचन :** प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# सहशिक्षक डी.एस. वाघमारे आणि त्यास मदत करणाऱ्या ग.शि. कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कधी करणार कारवाई ?


आधुनिक केसरी न्यूज


**सुनिल सिरसाट**


**अंबाजोगाई :** सीईओ अजित पवार आपण येण्याअगोदर पासूनचे अनेक प्रकरणे केवळ निर्णय घेण्यावाचून प्रलंबित आहेत. काही बोटावर मोजण्या ईतपत प्रकरणात अगोदरच्या सीईओंनी निर्णय घेतले तर त्यास केराची टोपली दाखवत अनेकांनी गांधीछाप नोटांचे दर्शन घडवून तर काहींनी राजकीय वरदहस्ताने तात्काळ त्या निर्णयांना फाटा देत प्रतिनियुक्ती करून घेत आजतागायत बीड जि.प. मध्ये प्रसंगी विभाग बदलून ठाण मांडलेले आहे. आपण आलात तेंव्हाही परिस्थिती अशीच काहीशी होती. परंतु अशांची वाढती मनमानी, वाढता अनागोंदी कारभार आणि वाढत्या तक्रारी आपणालाच पहावेनाशा झाल्याने आपण अलीकडच्या सहा महिन्यात ज्या पद्धतीने सुनावण्या-कारवायांचा बडगा उचलला आहे. त्यावरून एक मात्र निश्चित दिसून येत आहे की, बऱ्याच कर्मचारी-अधिकारी वर्गातील बोगस कामात हात असणाऱ्या ठकांची आता चांगलीच भांबेरी उडाली असून आपला नंबर कधी लागतो की....? आपल्यावर तर कारवाई होणार नाही ना.....?? या भीतीने सद्यस्थितीला अनेकजण अस्वस्थ झालेले दिसून येत आहेत. त्याबद्दल आपले मानावे तेवढे आभार, करावे तेवढे कौतुक कमीच......!

**डी.एस.वाघमारे प्रकरणाचे काय.....??**

परंतु सीईओ हे सारे नित्यनेमाने सुरू असताना आपले अंबाजोगाई गटशिक्षणाधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या बोगस वेतन उचलणाऱ्या शिक्षक वाघमारे डी.एस. व शिक्षीका श्रीमती मंगल बिचकुले यांच्यासह या प्रकरणात वरिष्ठांच्या आदेशाला बगल देऊन जाणीवपूर्वक केवळ मोहमाये पोटी खोटे-नाटे खरे दर्शवून या तिन्ही शिक्षक-शिक्षकांचे या कार्यालयातील तत्कालीन गटशिक्षणाधिकारी रंगनाथ राऊत, विशेष म्हणजे नेहमीच अशा प्रकरणात हिरारीने झोकून देऊन काम करणारे कार्यालय अधीक्षक शिवाजी रोडे, त्यांच्या सहकारी दोन महिला कर्मचारी यांनी शासनाची एवढ्या मोठ्या प्रमाणात फसवणूक केली असल्याचे पुराव्यानिशी उघडकीस आल्याने अलीकडच्या दोन महिन्यांपासून याबाबतीत दै. आधुनिक केसरी, दै. सुपर भारत सह अन्य दैनिकातून तर BM NEWS चॅनल मधून प्रकर्षाने या प्रकरणा संबंधित बातम्या प्रसारित होत असतानाही याबाबत अद्यापही आपल्या स्तरावरून शून्य कारवाई आहे. तेंव्हा यामागे नेमके काय गोड बंगाल आहे.....?? जर काहीच नसेल तर अद्यापही काही एक पाऊल का उचललेले नाही.......??? असे एक ना अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होऊ लागले आहेत. आपण सरकारचे जबाबदार IAS दर्जाचे अधिकारी असून दुसऱ्या बाजूला शासनाला लाखोंचा चुना लागलेला असताना आपण असे गप्प कसे काय.......? ? ? ? तेंव्हा आपण तात्काळ डी.एस. वाघमारे या शिक्षकासह सोबतच्या सहकारी शिक्षिका आणि त्यांना गरज नसताना या गैरप्रकरणात मदत करणाऱ्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय आंबेजोगाई येथील कर्मचारी-अधिकाऱ्यांवर कधी आणि काय कारवाई करणार.....?? याकडेच आता अंबाजोगाईसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.......!


शिक्षण विभाग
जिल्हा परिषद बीड
26 NOV 2019
आदेश


शिक्षण विभाग


शिक्षण विभाग
06 APR 2018



# पत्रकार सेवा संघाचा आ.प्रशांत बंब यांना जाहीर पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** आमदार आ. प्रशांत बंब यांनी विधीमंडळ पावसाळी अधिवेशन दरम्यान दि.२३ ऑगस्ट २०२२ रोजी पुरवणी मागणी भाग क्र.५२, ५३ शालेय शिक्षण विषयानुसार जो शासकीय कर्मचाऱ्यांकडून भाडेपत्रक जोडून राज्य शासनातर्फे उकळल्या जाणाऱ्या पैश्यांचा होणारा (अंदाजित २००० कोटींचा) अपव्यय टाळण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला तो खुपच योग्य प्रश्न मांडला होता. गाव पातळीवरील सर्वच शासकीय कर्मचारी यांनी गावात राहणे बंधनकारक असताना ते शहराच्या/तालुक्याच्या /जिल्ह्याच्या ठिकाणी राहणे पसंद करतात.

त्यांच्या मुलांना जिल्हा परिषद अथवा शासनाच्या शाळेत प्रवेश न देता खाजगी/नामवंत शाळांमध्ये प्रवेश देतात यामुळे गावपातळीवर ग्रामीण भागाचा कणा असलेले जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी, वायरमन, कृषीसहायक, आरोग्य कर्मचारी यांच्यासह बहुतांश अधिकारी वं कर्मचारी हे नेमणूकीच्या गावाच्या ठिकाणी न राहता शहरात राहून अपडाऊन करतात. त्यामुळे जो हवा तो विकासात्मक कौल, शैक्षणिक दर्जा, आरोग्य दर्जा मिळतच नाही यावर राज्य सरकारने त्यांना गावात राहणे बंधनकारक करावे अन्यथा सदरील घरभाडे देणे बंद करावे, असे मत आ. प्रशांत बंब यांनी सभागृहात व्यक्त केले होते. या सदरील प्रश्नांसाठी १००% उपाययोजना होऊन निर्णय व्हावा यासाठी पत्रकार सेवा संघ (महाराष्ट्र राज्य) यांच्यावतीने या प्रश्नांच्या विशेष मागणीसाठी आ.प्रशांत बंब यांना पत्रकार सेवा संघाचा जाहीर पाठींबा देत असल्याचे पत्र पत्रकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष रामनाथ जऱ्हाड यांच्या आदेशाने देण्यात आले. दरम्यान निवेदन मराठवाडा अध्यक्ष गुलाब पाटील वाघ, मराठवाडा सचिव फिरोज मन्सूरी, पत्रकार सलीम सय्यद यांनी आ. प्रशांत बंब यांचे स्वीय सहाय्यक रवींद्र पाटील चव्हाण, मा.बांधकाम सभापती संतोष पाटील जाधव, भाजपचे जिल्हाउपाध्यक्ष अमोल पाटील जाधव, सरपंच मीनाताई पांडव, संजय पांडव, ग्रामपंचायत सदस्य अशोक सौदागर, कल्याण पवार, बाजार समितीचे संचालक सोपान बोरकर, सुरेश जाधव, मा.उपसरपंच गणेश व्यवहारे, भगवान गाडे, संतोष काळे, सचिन पांडे आदिसह पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# तलवाडा येथे ड्रॉ पद्धतीने पोळा सण साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील तलवाडा (नागवाडी) येथे ड्रॉ पद्धतीने पोळा साजरा करण्यात आला. बऱ्याचदा पोळा सणाच्या मानापानावरुन वाद होतात. पोळ्याचा मान हा प्रत्येक शेतकऱ्याला मिळावा या हेतूने प्रत्येक शेतकऱ्याच्या नावाने चिठ्ठ्या टाकण्यात आल्या होत्या. यावेळी लहान मुलाच्या हस्ते काढून बाबासाहेब तातेराव मगर या शेतकऱ्याच्या नावाची चिठ्ठी निघाली. त्या शेतकऱ्याच्या बैलांना वेसन, मोहरी, माठुकी, कासरा देऊन शेतकऱ्याचा शाल, श्रीफळ देऊन शेतकऱ्याचा सत्कार करण्यात आला व त्या शेतकऱ्याला पोळ्याचा मान दिला. यानंतर ज्या शेतकऱ्याला मान मिळाला आशा शेतकऱ्यांच्या नावाची चिठ्ठी पुढील वर्षी काढली जाणार नाही, जेणेकरुन प्रत्येक शेतकऱ्याला मान मिळेल, असे कृऊबा समितीचे सभापती भागीनाथ मगर यांनी सांगितले तर अशा ड्रॉ पध्दतीने पोळा साजरा झाल्यामुळे गावातील प्रत्येकाला मान मिळेल अशा पद्धतीने सण साजरे केल्यास सामाजिक सलोखा साखण्यास मदत होते. यावेळी मारोती मंदिरात नारळ फोडुन भरपूर पाऊस पडुदे ईडा पिडा टळुदे बळीच राज्य येऊदे आसे मारोती रायाला साकडे घातले.

शेतकरी आपण ज्या बैलाच्या जीवावर शेती कसतो, त्या बैलाच्या कष्टातून ऋणमुक्त होण्याचा प्रयत्न करतो. बैल पोळा हा सण शेतकरी मोठ्या उत्साहात साजरा करतो. पोळ्यात बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण आहे. शेतीप्रधान या देशात व शेतकऱ्यांत या सणाला विशेष महत्त्व आहे. सर्वांगावर गेरुचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, मटुक्या गळ्यात कवड्या व घुंगुरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात करदोड्याचे तोडे, असा श्रृंगार चढवुन बैलांना खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य. गावाच्या मारोती मंदिराला एक मोठे आंब्याच्या पानाचे तोरण करून बांधतात. त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनया, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणून पोळा फुटला.

यावेळी कृ.ऊ.बा.मा सभापती भागिनाथ मगर, चेअरमन राजेन्द्र मगर, शिवाजी मगर, शाउलाल मगर, विठ्ठल मगर, अरुण जाधव, मनोहर मगर, शामराव मगर, आबासाहेब मगर, काशिनाथ मगर, आशोक मगर, भानुदास जाधव, लक्ष्मण मगर यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांनी कडा पाडा टळुदे बळी राज्य येऊदे मोठ्या प्रमाणात पाऊस पडू दे आसे साकडे मारुतीला घातले.



# कुंभार पिंपळगावात दोन्ही बैलांचा खदाणीत बुडून दुर्दैवी अंत

आधुनिक केसरी न्यूज

**कुंभार पिंपळगाव :** धन्याच्या शेतात वर्षभर राबलेल्या जोडीला सजवून गावभर मिरवण्याची वेळ जवळ येत असताना घनसावंगी तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या दोन्ही बैलांचा खदाणीत बुडून दुर्दैवी अंत झाला. विशेष बाब म्हणजे शेतकरी या बैलांना धुण्यासाठी या खदाणीत घेऊन आला होता. पोळा सण साजरा करण्यासाठी काही तास उरलेले असताना डोळ्यासमोर बैलजोडीचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याने जीवाच्या आकांताने मोठमोठ्याने टाहो फोड होता. घनसावंगी तालुक्यातील घोंशी बु. येथे ही दुखद घटना घडली.

येथील शेतकरी सीताराम आव्हाड हे पोळ्यासाठी आपल्या बैलजोडीला सजवण्याआधी त्यांना धुण्यासाठी गावालगत असलेल्या खदाणीत दुपारी १२ वाजेच्या सुमारास घेऊन गेले होते. घोंशी गावापासून ही खदाण एक किलोमीटर अंतरावर होती. दोन्ही बैल पाण्यात उतरल्यानंतर त्यातील एका बैल्याच्या पायात कासरा अडकल्याने तो पाण्यात गटांगळ्या खाऊ लागला. त्यांना वाचविण्यासाठी शेतकरी सीताराम आव्हाड यांनी आरडाओरडा करून आजूबाजूच्या लोकांना बोलावण्याचा प्रयत्न केला. परंतु, कुणी मदतीला येईपर्यंत त्यांच्या दोन्ही बैलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

आपल्या डोळ्यासमोर लाडक्या बैलजोडीचा अंत झाल्याने शेतकऱ्याने खदाणीत टाहो फोडला होता. आपल्या सर्जा राजाची जल्लोषात मिरवणूक काढण्याऐवजी त्यांना शेवटचा निरोप देण्याची वेळ शेतकरी आव्हाड यांच्यावर आल्याने त्यांना दुःख अनावर झाले होते. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

**बैल जोडीचा होता कुटुंबाला आधार**

शेतकरी सीताराम आव्हाड यांना दोन एकर जमीन आहे. बैलजोडीच्या मदतीने ते आपल्या शेतीबरोबरच दुसऱ्याच्या शेताची मशागत करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचे. परंतु, दोन्ही बैल्याच्या मृत्यूमुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

## बैल धुण्यासाठी गेलेल्या दोन शेतकऱ्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यात राळेगाव तालुक्यातील सरई येथे पोळ्याच्या दिवशी बैल धुण्यासाठी शेततळ्यावर गेलेल्या दोघांचा बुडून मृत्यू झाला. आज दुपारी ही घटना घडली. गजानन राजुरकर वय (२५) व रावबा टेकाम वय (४२) रा. सरई असे मृताचे नाव आहे. पोळ्यानिमित्त दि.२६ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी बैलाला धुण्यासाठी शेततळ्यात गेले होते. मात्र अचानक पाय घसरल्याने ते शेततळ्यात बुडाले. शेततळ्यात खड्ड्याचा अंदाज न आल्यामुळे त्यांचा पाय घसरला. गावकऱ्यांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र बराच वेळ शोध घेतल्यानंतर त्यांचा मृतदेह हाती लागला. ऐन पोळ्याच्या दिवशी शेतकऱ्याचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाला आहे.

**पोळ्याच्या दिवशी कोसळला दुःखाचा डोंगर**

# पुन्हा चंद्रावर स्वारी ?

आधुनिक केसरी

अमेरिकेच्या 'नासा'ने पुन्हा एकदा चांद्र मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेला अर्टेमीस असे नाव देण्यात आले आहे. भविष्यात चंद्रावर मानवी वस्ती आणि त्याचा आधार घेत मंगळ ग्रहावर स्वारी असे नासाचे सर्वसाधारण नियोजन आहे. यासाठी चंद्रापर्यंत अंतराळवीरांना पोहचण्यासाठी आत्तापर्यंतचे जगातील सर्वात शक्तीशाली रॉकेट तयार करण्यात आले आहे. पुढील काही दिवसात हवामान अनुकूल असल्यास हे रॉकेट उड्डाण करणार आहे. या पहिल्या उड्डाणात प्रत्यक्ष अंतराळवीर स्वार होणार नसले तरी यानिमित्ताने शक्तीशाली रॉकेटची चाचपणी केली जाणार आहे. एवढेच नाही तर चंद्राभोवती ओरीअन नावाचे यान पाठवत ते पृथ्वीवर परत आणले जाणार आहे. यानिमित्ताने भविष्यात अंतराळवीरांची वाहतुक करणाऱ्या या ओरीअनचीही चाचणी घेतली जाणार आहे. १९६९-७२ या कालावधीत नासाचे अंतराळवीर हे चंद्रावर जाऊन आले त्यासाठी सतुर्न ५ या शक्तीशाली रॉकेटचा वापर करण्यात आला होता. त्यापेक्षा एसएलएस जरा लहान असले तरी अत्याधुनिक अशा इंजिनांमुळे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या विरोधात मिळणारा धक्का प्रचंड असणार आहे. यामुळे वजन वाहुन नेण्याची एसएलएसची क्षमता अचाट अशी बनली असून या रॉकेटच्या माध्यमातून पृथ्वीच्या कक्षेबाहेर तब्बल १०० टनापेक्षा जास्त वजन हे वाहुन नेले जाऊ शकते एवढे एसएलएस हे शक्तीशाली आहे. या रॉकेटची उंची तब्बल ९८ मीटर असून इंथन भरल्यास या रॉकेट वजनच तब्बल २६०० टन भरेल एवढे एसएलएस रॉकेट भव्य आहे. या रॉकेटच्या मुख्य भागाला दोन छोटी रॉकेट आहेत ज्याचा पुर्नवापर शक्य आहे. नासाच्या 'अपोलो' मोहिमेअंतर्गत एकुण १२ अंतराळवीरांनी १९६९ ते १९७२ दरम्यान चंद्रावर मुक्त संचार केला होता. चंद्रावरील माती-दगड हे पृथ्वीवर आणण्यात आले होते. शीतुद्धाच्या काळात यानिमित्ताने अमेरिकेने चंद्राच्या शर्यतीत तेव्हाच्या सोव्हिएत रशियाला मागे टाकले होते. या मोहिमेसाठी अब्जावधी डॉलर्सचा खर्च आला होता. आत्ताच्या अर्टेमीस मोहिमेत एसएलएस रॉकेटच्या संशोधनासाठी २० अब्ज डॉलर्स खर्च झाले असून पहिल्या उड्डाणाचा खर्च हा दोन अब्ज डॉलर्सच्या घरात असल्याचे म्हटले जात आहे. अर्टेमीस ही आत्तापर्यंतची नासाची सर्वात महागडी अवकाश मोहिम समजली जात आहे. जर ही पहिली मोहिम यशस्वी झाली तर पुढच्या मोहिमेत अंतराळवीर हे चंद्राच्या पृष्ठभागापासून ६० किलोमीटर उंचीवरुन – एवढ्या जवळने प्रवास करतील. तर पुढच्या मोहिमेत २०२५ च्या सुमारास तीन अंतराळवीर हे प्रत्यक्ष चंद्रावर उतरणार आहेत ज्यामध्ये पहिले पाऊल हे महिला अंतराळवीरेचे असेल.

# बिल्वपुरीच्या कन्येचा अखिल भारतीय सन्मान !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**साहित्य, कला यासाठी समर्पित असा बर्वे परिवार ! गायनाचा वारसा या परिवारात सुप्रसिद्ध गायिका मालती पांडे यानी आणला. स्वतः बर्वे सर हे पण गायन क्षेत्रात आहेतच पण दोन्ही कन्या प्रियांका आणि प्रांजली या संगीत क्षेत्रात नवी क्षितिजे गाठत आहेत. बिल्वपुरीच्या केशव गोविंदाने बेलापूरचे सुपुत्र आचार्य किशोरजी व्यास याना अध्यात्मिक क्षेत्रात मार्गक्रमण करण्यासाठी आशीर्वाद दिले आणि आचार्य किशोरजी व्यास हे स्वामी गोविंददेव गिरी होऊन अखिल भारतात प्रसिद्ध पावले. तोच आशीर्वाद संगीता गोंगे या बेलापूरच्या भगिनीला साहित्यिक क्षेत्रात मिळाला आणि त्या प्रतिभावान साहित्यिक सौ. संगीता बर्वे या नावाने प्रसिद्ध झाल्या आणि त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. त्यांचे खूप खूप अभिनंदन !**

काल साहित्य जगतातील साहित्य अकादमी या प्रतिष्ठित पुरस्काराची घोषणा झाली आणि बाल साहित्यासाठीचा पुरस्कार सौ. संगीता बर्वे याना जाहीर झाला ! संपूर्ण नगरच्या नव्हे कदाचित महाराष्ट्राच्या साहित्य वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

साहित्यिक, अभिनेते, गायक, कलाकार यांच्याभोवती सामान्य माणूस स्वतः च एक हस्तिदंती आवरण तयार करतो आणि त्यामुळे सामान्य माणूस आणि त्यांच्यात एक मानसिक अंतर निर्माण होते. भावनिक नाते खूप जवळचे पण मानसिक अंतर खूप दूरचे असे हे नाते असते आणि त्यामुळे कधी कधी साहित्यिक पण वास्तव आणि कल्पना याचा योग्य मेळ घालू शकत नाहीत. पण साहित्यिक डॉ. संगीताताई या वास्तवाशी निगडित असलेल्या आणि त्यातून साहित्य निर्माण करणाऱ्या एक कवयत्री आणि बाल साहित्यकार ! बेलापूरसारख्या छोट्या गावात ज्यांचा जन्म झाला आणि शालेय जीवनातच ज्यांची साहित्यिक प्रतिभा फुलत गेली. आपले आई वडिलांच्या शिक्षकी पेशाचा संस्कार त्यांचा साहित्यिक संपदेवर होत राहिला.

लहानपणी नोकरीसाठी आई / बाबा यांनी केलेली भावनिक तडजोड त्यांनी अनुभवली. कधी आईचा तर कधी बाबांचा सहवास ! कारण कधी आईकडे तर कधी बाबा बरोबर राहावे लागले. पण यातून त्यांची निसर्गाची मैत्री वाढली आणि त्यातून कवितेच्या रुपात शब्दबद्ध झाली.

वैद्यकीय शिक्षण घेताना सर्वसाधारण परिस्थितीत विद्यार्थी सहाय्यक समितीच्या वसतिगृहात राह्यल्यामुळे सर्वसामान्य जनांची भाव भावना अधिक परिचित झाली. देहदान चळवळ आता थोडी रुजू लागली आहे, पण त्यांनाशिक्षण घेताना, शरीरशास्त्र शिकण्यासाठी लागणारे मृत शरीर मिळवण्यासाठी कराव्या लागलेल्या धडपडीतून त्या मृत शरीरातील आत्म्याशी त्यांचे संवेदनशील मन तादात्म्य पावले आणि त्यातून जे काव्य निर्माण झाले ते आज बहुतेक मेडिकल कॉलेज मध्ये प्रयोग शाळेत प्रेरणेचा स्रोत बनले आहे.

मेडिकलनंतर पर्वती भागात opd चालवतानाकष्टकरी महिलांचा / पुरुष यांचा जीवन संघर्ष हा त्यांनी जवळून बघितला






आणि त्या अधिक संवेदनशील बनत गेल्या त्याचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात उमटत गेले. गेल्याच वर्षी कै. अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्रात अध्यक्ष स्थान भूषविताना आपल्या काव्यातून त्यांनी उपेक्षितांचे अंतरंगच जणू प्रगट केले.

अलीकडील काळात त्यांच्या प्रतिभेला चित्रपट गीतांचे दालन नव्याने उघडले आहे आणि कै. शांता शेळके किंवा वंदना विटणकर यांची परंपरा त्या जणू पुढे नेत आहेत हे धर्मवीर किंवा अन्य काही गाण्यांची शब्द रचना बघितल्यावरआणि ऐकल्यावर जाणवते. (योयोगाने सौ . वंदना विटणकर नगरच्याच) अलीकडे स्वर आणि शब्द यापासून दूर जाणाऱ्या सिनेसंगीतात संगीता बर्वे यांच्या रचना निश्चितच रसिकांचे मन प्रसन्न करणाऱ्या आहेत . धर्मवीर मधील गुरू शिष्याचे नाते जितक्या श्रद्धेने त्या शब्दबद्ध करतात तेव्हढ्याच हळुवारपणे प्रेमकाव्य आणि पारंपरिक प्रसंगावरील गीते समर्थपणे लिहताना त्या दिसतात हे अलीकडील काही त्यांच्या गीतांवरून दिसून येते.

बाल साहित्य आम्ही बाल असताना किशोर, कुमार, चांदोबा या मासिकांनी संवर्धित होत होते. बाल साहित्यिक अगदी रत्नाकर मतकरी, सई परांजपे ते दत्ता टोळ यानी आमचे विचार आणि कल्पनेचे विश्व विस्तारले.

हल्ली बाल साहित्य कमी होत असताना सौ संगीताताई यानी ती परंपरा आणि जबाबदारी पेलली आणि त्याची दखल घेताना साहित्य अकादमीने 'पियूची वही' या त्यांच्या कादंबरी बद्दल त्यांना पुरस्कार जाहीर केला आणि तोही विंदा करंदीकर या ज्ञानपीठ विजेत्या कवींच्या जन्मदिनी ! हा विलक्षण योगायोग आहे.

बेलापूर सारख्या छोट्या गावातून फुललेल्या साहित्य प्रतिभेला इतका मोठा पुरस्कार मिळत आहे याचा आनंद होण्याची दोन कारणे आहेत. एक बेलापूर गावात कधी काळी राहण्याचा योग आला होता आणि संगीताताई माझ्या बहिणीच्या बाल मैत्रीण असल्याने त्यांचा प्रतिभेचा विकास बघता आला . दुसरी गोष्ट म्हणजे या देशात गुणवान आणि प्रतिभावान लोकांचा शोध घेऊन त्यांना पुरस्कृत केले जाते , त्यांचा सन्मान केला जातो हे सिद्ध झाले . लोकांचा व्यवस्थेवरचा विश्वास वाढायला अशा गोष्टी उपयोगी ठरतात . आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे कै . ग. म .मुळे स्मृती व्याख्यान मालेतील त्या एक वर्ष महनीय वक्त्या होत्या आणि त्यावेळी झालेली त्यांची प्रगट मुलाखत त्यांच्या सामाजिक बांधिलकीची साक्ष देणारी होती.

नुकतेच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात क्रांतिकारी शिवराम हरी राजगुरू याच्यावर एक अतिशय सुंदर काव्य त्यांनी लिहले. त्याचे झालेले गाण्यात रूपांतर अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या साहित्यिक प्रेरणा पुरस्कार मिळवण्यासाठी कधीच नव्हत्या ! त्यात शुद्ध सामाजिक बांधिलकी आणि बाळ /गोपाळ मंडळींशी संवादाची आवश्यकता यावर भर होता. पुरस्कारासाठी तुम्ही पुरोगामी किंवा काही आधुनिक विचार मांडले पाहिजे किंवा तथाकथित आधुनिक जीवन जगले पाहिजे , हा समज त्यांच्या पुरस्काराने खोडून निघाला आहे. हे आणखी एक या पुरस्काराचे वैशिट्य म्हणावे लागेल!

' पियूची वही 'ही एक लहान मुलीची गोष्ट ! खिडकीत बसून निसर्गाशी ती बोलायला लागते आणि त्यातून तिला जे आकलन होते त्याची वही बनते, ती ही पियूची वही ! मोबाईलच्या जगात हरवलेले मुलांचे बालपण पुन्हा त्यांना मिळून दयायचे असेल तर सकस साहित्य निर्मिती हा त्याचा मार्ग असू शकतो आणि सौ संगीताताई यांनी तो मार्ग दाखवून दिला आहे हे या पुरस्काराने अधोरेखित होते.

# 'झोंबी' : एक बाल्य हरवलेले बालकांड



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**मराठी भाषेतील असेच एक गाजलेले आणि प्रत्येक वाचकाला भावलेले आत्मचरित्र म्हणजे मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित लेखक आनंद यादव यांचे ' झोंबी '! या आत्मचरित्राला या वर्षी पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. लेखक श्री आनंद यादव आता आपल्यात नाहीत, परंतु नवीन पिढीतील वाचकांना त्यांच्या या पुस्तकाची ओळख करून देण्यासाठी या पुस्तक परिक्षणाच्या निमित्ताने त्यांना अर्पण केलेली ही शब्दांजली! शाळेत असताना 'पाटी आणि पोळी' हा त्यांचा या पुस्तकातील संदर्भाचा धडा होता. तेव्हापासून हे संपूर्ण पुस्तक वाचायचे ठरविले होते.**

आत्मचरित्र! मराठी वाचन साहित्य विश्वात लोकप्रिय असा लेखन प्रकार! आपल्या जीवनविषयक अनुभवांचे आणि त्या अनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय. आत्मचरित्रपर लेखन सर्वच भाषांत आढळून येते कारण यासाठी आत्यंतिक गरजेची आत्माविष्काराची मानवी प्रवृत्ती ही नैसर्गिक व सार्वत्रिक आहे. आत्मचरित्रामागे आत्माविष्काराची प्रेरणा, आत्मजीवनाच्या अर्थपूर्णतेची अभिज्ञता, स्वानुभवांतील निवडीची दृष्टी आणि लेखनशैलीविषयक भान अशा अनेक गोष्टी प्रेरक असतात.

मराठी भाषेतील असेच एक गाजलेले आणि प्रत्येक वाचकाला भावलेले आत्मचरित्र म्हणजे मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित लेखक आनंद यादव यांचे ' झोंबी '! साक्षात पु. ल. देशपांडे यांची तब्बल सोळा पानांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. झोंबी - एक बाल्य हरवलेले बालकांड असा मथळा देत पुलंनी अगदी भरभरून या पुस्तकाबद्दल लिहिले आहे. ते म्हणतात की झोंबी सारख्या वाचकाला अस्वस्थ करणाऱ्या ग्रंथानीच साऱ्या जगातील साहित्य समृध्द केले आहे.


या आत्मचरित्राला या वर्षी पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. लेखक श्री आनंद यादव आता आपल्यात नाहीत, परंतु नवीन पिढीतील वाचकांना त्यांच्या या पुस्तकाची ओळख करून देण्यासाठी या पुस्तक परिक्षणाच्या निमित्ताने त्यांना अर्पण केलेली ही शब्दांजली! शाळेत असताना 'पाटी आणि पोळी' हा त्यांचा या पुस्तकातील संदर्भाचा धडा होता. तेव्हापासून हे संपूर्ण पुस्तक वाचायचे ठरविले होते.

नावावरूनच या आत्मचारित्र्याच्या रूपरेषेची ओळख होते. झोंबी म्हणजे लढाई, लढा, द्वंद्व! पण ही लढाई दोन व्यक्तिंमधील नाही, दोन प्रदेशांमधील नाही, तर ही आहे गरिबीत जन्माला येऊन शिक्षणासाठी , विद्याप्राप्तीसाठी केलेली लढाई. आनंद यादवांच्या आयुष्यातला शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष म्हणजे ही आत्मचरित्रात्मक कादंबरी. महाराष्ट्रातील कागल या लहानशा खेडेगावातील त्यांच्या आयुष्याबद्दल लिहिताना त्यांनी घडलेले प्रसंग अस्सल कोल्हापुरी बोलीभाषेत लिहिले आहेत.

या कादंबरीत फक्त शिकण्यासाठी भोगलेल्या व्यथा किंवा शिक्षण घेण्यासाठी आलेले अडथळे फक्त नमूद केलेले आहेत असे नाही तर एकूणच गरीब, अज्ञानी अशा ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबाचे चित्रण आहे. लेखकाने आपले गाव, गावातील रीतिभाती, चाली - परंपरा याचा आढावा देत आपली कौटुंबिक पार्श्वभूमी सांगताना आपल्या वडिलांचा कर्मठ स्वभाव,आपल्या आईची होणारी ससेहोलपट, आपली भावंड, तान्ह्या भावंडांचे अल्पायुष्य हे सर्वच आपल्या संवेदनशील लेखणीतून मांडले आहे.

"साळा शिकून काय बी उपेग न्हाई, भटा-बामनाने साळा शिकावी." थोडक्यात, मिळालेले 2 पैसे शिक्षणा पेक्षा पोट भरण्यात खर्च करावेत अशी मानसिकता लेखकाच्या वडिलांची होती. पण त्यावेळी बालवयात असतानाही आपल्या शिक्षणाबद्दल ठाम भूमिका आणि निर्धार असलेल्या आनंद यादव यांना हे ठाऊक होते की या परिस्थितीतून बाहेर पडायचे असेल तर शिक्षणाला पर्याय नाही.

आपल्या शैक्षणीक आयुष्याबद्दल लिहिताना शाळेतील प्रसंग, शिक्षकांचे स्वभाव वागण्याच्या तऱ्हा आणि यामुळे होणारे भावनिक परिणाम ओघवत्या शैलीत लिहिले आहेत. त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक घटनांचा संदर्भ देत गावची उरूस,जत्रा,गांधीवधानंतर झालेली स्थिती...अशा अनेक गोष्टींचे संदर्भ लिहिले आहेत. एकूणच या कादंबरीचा आवाका खूप मोठा आहे.




लेखकाच्या आयुष्यात आलेले नातलग, मैत्र , गावकरी यांच्याबद्दल लिहितानाही लेखकाने त्यांचे उत्स्फूर्त आणि जिवंत असे व्यक्तिचित्रण केले आहे. गणपा, रतनु, आकणी, कंबळा, तारा, काजी मास्तर , आई, दादा, मामा यांच्याबद्दल वाचताना वाचकाच्या मनात ती पात्रे त्यांच्या आविर्भावासह उभी राहतात. त्यांच्या बालवयात त्यांना सिनेमा बघण्याची खूप आवड होती. ही आवड पूर्ण करण्यासाठी त्यांनी केलेले अनेक खटाटोप यात आपल्याला वाचायला मिळतात. शेणी विकून जेमतेम मिळणाऱ्या पैशातून पोट कसेबसे भरले जाईल, अशी परिस्थिती असताना त्यातूनही त्याच पैशाने आपली सिनेमा बघण्याची आवड ते कशी पूर्ण करत हे वाचणं रंजक झाले आहे.

हे पुस्तक वाचून शेवटच्या पानाकडे येता येता हे जाणवते की या आत्मचरित्राचे लेखन करताना, लेखक आनंद यादवांनी आपली कुणी कणव करावी, दया दाखवावी अशी भूमिका घेतलेली नाही. तर एका संवेदनशील चिंतनशील प्रगल्भ व्यक्तीने आपल्या बालपणी भोगलेल्या व्यथा इथे शब्दरूप केलेल्या आहेत असेच लक्षात येते. ही कादंबरी का वाचावी ? तर आजच्या काळात शिक्षणाचे महत्व पुन्हा एकदा समजून घेण्यासाठी, आपल्या समोर असलेल्या शिक्षणाच्या सर्व सुख सोयी सुविधा असताना त्याचा आपण किती जास्तीत जास्त उपयोग आता आपण सहज करून स्वतः चे भवितव्य उज्ज्वल करू शकतो हे समजून घेण्यासाठी... ही कादंबरी जरूर वाचावी.

कादंबरीतील लेखकाचा जीवनकाल आणि आताचा काळ यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आज मोबाईलच्या एका क्लिकवर सर्व शिक्षण उपलब्ध आहे. असे असताना आपण त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे हे आजच्या तरुण विद्यार्थी वाचक वर्गाने लक्षात घेतले तर हे संपूर्णपणे लेखकाच्या लेखणीचे यश असेल. आतापर्यंत या आत्मचरित्राला अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संगीतगुरु : डॉ. महावीर बागवडे



रश्मी हेडे
संपर्क क्र. .7038065658

आधुनिक केसरी

**संगीतामुळे मनुष्याच्या जीवनातील ताण तणाव कमी होतो अशी अदृश्य शक्ती संगीतामध्ये असते.आनंदी व उत्साही वातावरणाची निर्मिती होते जी रोजची कामे अथवा जबाबदारी पेलायला जणू एक सकारात्मक ऊर्जा प्रदान करते. संगीत क्षेत्रातील कौटुंबिक वारसा जपणारे, आपल्या गोड आवाजाने सर्वांना मंत्रमुग्ध करणारे तसेच पुणे विद्यापीठातून संगीत विषयात एम.ए. केलेले, आकाशवाणीचे ते मान्यताप्राप्त कलाकार, शास्त्रीय संगीतात गेली ३० वर्षांपासून वाटचाल करीत असलेले, नवीन पिढीला संगीत क्षेत्रात घडवण्याचे लाख मोलाचे काम करत असलेले, अशी दैवी देणगी लाभलेले व्यक्तिमत्व म्हणजे पुण्याचे डॉ महावीर माणिकचंद बागवडे होत.**

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील सावळज येथे २६ नोव्हेंबर १९६४ रोजी डॉ महावीर यांचा जन्म झाला. त्यांचे शालेय शिक्षण रयत शिक्षण संस्थेत झाले.शाळेत त्यांनी कधीही पहिला क्रमांक सोडला नाही. दहावीच्या परीक्षेत ८२ टक्के मिळवून ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. बारावीत देखील घवघवीत यश मिळवून ते तासगाव केंद्रात प्रथम आले. पुढे सांगली येथील कस्तुरबाई वालचंद कॉलेज मधून त्यांनी बीएससी. ही पदवी तर वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज मधून आयुर्वेदाचार्य ही पदवी प्राप्त केली.पुढे दवाखाना चालू करून गावात प्रॅक्टिस सुरू केली केली. श्री बागवडे यांचे वडील श्री माणिकचंद बाळकृष्ण बागवडे हे उत्तम शास्त्रीय भजन करीत. चुलते श्री चुनीलाल रामचंद्र बागवडे हे संगीत देत. त्यामुळे बालपणापासूनच त्यांना गायनाची गोडी लागली. वयाच्या तेराव्या वर्षापासून त्यांनी चुलते श्री चुनीलाल बागवडे उर्फ सावळजकर गुरुजी यांच्याकडून संगीताचे धडे घेण्यास सुरवात केली. सुरवातीला श्री बागवडे यांनी हार्मोनियम शिकायला सुरवात केली. मुळातच हुशार असल्याने अनेक रागांची माहिती मिळवून ते शिकून त्यात प्राविण्य मिळवले व वडिलांना हार्मोनियम वर साथ देऊ लागले.

सावळज गावात वडिलांची श्री सिद्धेश्वर नाट्यक्लब नावाची नाट्य संस्था होती. वडील भक्त पुंडलिक, संत तुकाराम अशा अनेक नाटकातून प्रबोधन करत. वडील उत्तम कलाकार, उत्तम गायक भजनकार होते. आजही गावात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या आवाजाची धार, ती गोडी आजही अनेकांच्या समरणात आहे. घरची शेती होती. त्यामुळे त्यांचे बालपण सुखात गेले. आई विमल माणिकचंद बागवडे या एक उत्तम गृहिणी होत्या. संगीत व शिक्षण याचा उत्तम मेळ बागवडे यांनी साधला.

श्री बागवडे यांची हुशारी लक्षात घेऊन सावळजकर गुरुजी यांनी महावीर यांना प्रथम राग 'यमन ' गायनासाठी दिला. स्वतः गुरुजींनी तासन्तास बसून तयारी करून घेतली. रागातील बारकावे, तालाची तयारी, शास्त्रीय गायनासाठी लागणारी सुरावट यांचा त्यांनी कसून अभ्यास घेतला. राग यमन बरोबरच गुरुजींनी त्यांना जवळजवळ शंभर रागांची लिखित स्वरूपाची माहिती दिली. यमनप्रमाणे राग, मधुवंती, भीमपलास, मालकंस शुद्धसारंग, पटदीप या रागांतील चीजा त्यांना गायनाच्या तयारीसाठी दिल्या. संगीत स्पर्धांमध्ये त्यांनी सातत्याने भाग घेतला. ते रोज पहाटे पाच वाजता उठून रियाज करायचे.

१८ डिसेंबर १९९२ रोजी त्यांचे लग्न पुण्यातील सुनीता विजय रासने यांच्याशी झाले. पत्नी सुनीता या होमिओपॅथी तज्ज्ञ डॉक्टर आहेत. गावात फारश्या सोयी सुविधा नसल्याने ते पुण्यात आले. खरे तर गाणे शिकण्यासाठी ते पुण्यात आले. घरातील व्यक्तींचा विरोध होता कारण गावात त्यांचा दवाखाना चांगला चालत होता. गाण्यात करियर



देखील करता येऊ शकते हे गावातील लोकांना पटत नव्हते. मात्र आपल्या स्वप्नपूर्तीसाठी व पत्नीने पूर्ण पाठिंबा दर्शविल्या मुळेच त्यांनी हा धाडसी निर्णय घेतला. पुण्यात नाईक हॉस्पिटल येथे ते राहत होते व पत्नी पूर्ण वेळ सेवा देत होती.

दवाखाना सांभाळून ते शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेत होते. पुण्यातील प्रसिद्ध शिक्षक पंडित गंगाधरशास्त्री पिंपळखरे बुवा हे त्यांचे गुरू, ज्यांनी मोजक्याच शिष्यांना मार्गदर्शन केले. ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठातुन त्यांनी एम. ए. पूर्ण केले. दवाखाना व संगीत अशी दुहेरी कसरत चालू होती. ती वेळ अतिशय खडतर होती. संघर्षमय परिस्थितीशी पती-पत्नीने हिमतीने सामना केला. काही कारणांमुळे त्यांना पुन्हा गावी जावे लागले. दवाखाना व घरीच गाण्याचे क्लासेस त्यांनी सुरू केले. २००२ ते २००५ गावात कोरडा दुष्काळ पडला. शेतीचे नुकसान झाले. अतिशय वाईट परिस्थिती निर्माण झाली. २००५ साली कोल्हापूर जिल्ह्यातील बाहुबली येथे दवाखान्यात २४ तास ते आरोग्य सेवा देऊ लागले. मोठा मुलगा गावात शिकायला होता. तर पत्नी व लहान मुलगा पुण्यात. संपूर्ण कुटुंब विखुरले होते. म्हणून पुन्हा पुण्यात जाण्याचा निर्णय घेतला. आपण सर्व एकत्र राहिले पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत होते. संगीत व दवाखाना अशी दुहेरी कसरत चालू होती. त्यांनी कधीही आशा सोडली नाही म्हणून परमेश्वराने देखील त्यांना निराश केले नाही. मेहनतीच्या जोरावर दिवसेंदिवस प्रगती होत गेली. खूप मेहनतीने, चिकाटीने व प्रामाणिकपणे काम ते करत होते.

शाहीर मावळे यांच्या पूर्वीपासून संपर्कात राहिल्याने त्यांच्या गृप सोबत हार्मोनियम वाजवण्याची संधी त्यांना मिळत होती. पुढे दिल्ली, भोपाळ, लातूर असे अनेक ठिकाणी ते गेले. नारदीय किर्तनात तसेच पोवाड्यातही ते साथ देत होते. २०१२ साली स्वर निनाद नावाची पदवी श्री विद्याभारती सेवा प्रतिष्ठान तर्फे ज्योतिषाचार्य श्री प्रकाशजी काळे यांच्या हस्ते डॉ महावीर यांना देण्यात आली तो एक अविस्मरणीय क्षण होता.

२०१३ साली इंडस हेल्थ सर्विस येथे त्यांनी नोकरी सुरू केली. येथे अनेक कॉर्पोरेट क्षेत्रातील नावाजलेल्या कंपनीच्या कामगारांचे आरोग्य तपासले जाई. नोकरी व गायन याचा त्यांनी उत्तम समतोल साधला. आतापर्यंत पुण्यात त्यांनी अनेक मैफिली केल्या आहेत. कालिका देवी मंदिर, रोटरी क्लब ऑफ पुणे, सुप्रसिद्ध नाईकवाडा ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ आदी ठिकाणी त्यांचे सार्वजनिक कार्यक्रम झाले आहेत.

शास्त्रीय संगीतामध्ये त्यांची ख्याल गायकी, नाट्यसंगीत व भजनामध्ये चांगली गती आहे. सदाशिव पेठेतील स्वर ताल साधना या संस्थेत शास्त्रीय व सुगम संगीताचे धडे डॉ. महावीर देत आहेत. कोरोनाच्या काळात ऑनलाईन क्लासेस चालू केले. ज्यामध्ये देश विदेशातील अनेक विद्यार्थ्यांचा समावेश होता. तो उपक्रम आजही अविरत चालू आहे. पुणे महानगपालिकेच्या शाळेत देशगीत, भक्तीगीत, समूहगीत ते बसवून देतात. तसेच आज अनेक कार्यक्रमात निवड समितीवर देखील ते काम करत आहे.

आज ते पूर्ण वेळ शास्त्रीय संगीताचे क्लासेस घेतात. संगीत क्षेत्रात डॉ. महावीर यांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते. घराण्याचा वारसा ते पुढे चालवू शकले व आपल्या कलेला न्याय देऊ शकले याचा त्यांना मनस्वी समाधान व आनंद होतो. २०२१ साली जेव्हा डॉ.महावीर यांची अँजिओप्लास्टी झाली तेव्हा पासून त्यांना नोकरी सोडावी लागली व पूर्णवेळ ते संगीत क्षेत्रात काम करू लागले. आज अमेरिका, कुवेत, जर्मनी, रुमेनिया अशा अनेक देशातील लोकांना ते शास्त्रीय संगीताचे ऑनलाईन प्रशिक्षण देत आहेत. स्वर निनाद कला अकॅडमी ही संस्था सद्या घरीच चालू केलेली असून अनेक परदेशी, स्थानिक शिष्य घडवण्याचे मोलाचे काम ते करत आहेत.

डॉ. महावीर यांचा मोठा मुलगा निषाद बीई इंजिनिअर असून त्याने १) hobbies stuff com - personalised gifting solution. 2) Eglence Mobility जी इलेक्ट्रिक व्हील चेअर बनवण्याचे काम करत आहे, अशा दोन कंपन्या सुरू केल्या आहेत. लहान मुलगा रिषभ महावीर पुण्यातील IISER या संस्थेतुन एम.एस.सी. झाला असून जर्मनी येथील Bielefeld या युनिव्हर्सिटीत पीएचडी. करत आहे. डॉ महावीर यांना पत्नीचे पूर्ण सहकार्य असल्यानेच त्यांचे स्वप्न सत्यात उतरू शकले असे ते आवर्जून सांगतात.

डॉ. महावीर यांनी सुप्रसिद्ध दगडूशेठ दत्त मंदिर, गीता मंदिर अश्या अनेक ठिकाणी गायनाचे कार्यक्रम सादर करून अनेकांची मन जिंकली आहेत. ते पुणे आकाशवाणीचे कलाकार देखील आहे. संगीत क्षेत्रात स्वतःचे क्लासेस सुरू करता येतात. तसेच देश विदेशात कार्यक्रमात भाग घेता येतो. संगीत क्षेत्रात बी.ए., एम.ए. व पीएचडी देखील प्राप्त करता येते. आपल्याला कलेत करियर करता येते. एक उत्तम संधी म्हणून तरुणांनी संगीत क्षेत्राकडे पाहिले पाहिजे. या क्षेत्रात मान सन्मान देखील मिळतो व भविष्य उज्जवल करता येते. संगीत क्षेत्राला आज चांगले दिवस आले आहेत. एक प्रतिष्ठित व्यवसाय म्हणून या क्षेत्राकडे पाहिले जाते. आज सोशल मीडियाच्या माध्यमातून देखील या गोष्टी अजून सोप्या झाल्या आहेत. फक्त त्याचा योग्य उपयोग केला तर निश्चितच स्वतः प्रगती साधता येते. संगीत क्षेत्रात वाटचाल करू इच्छिनाऱ्या मुलांना ते मार्गदर्शन करतात.

संगीताने झपाटलेले एक व्यक्तिमत्व असा उल्लेख करावा असे डॉ बागवडे निश्चितच एक आदर्श व उत्तम उदाहरण आहे. अतिशय जिद्दी व महत्वाकांक्षी व्यक्तिमत्व लाभलेल्या डॉ. बागवडे यांना भावी वाटचालीसाठी अनेक अनेक शुभेच्छा.

**संपादन : देवेंद्र भुजबळ. 9869484800.**

# रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**मागील 2 वर्षात करोना महामारीने पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण केले. परंतु यावर्षी करोना महामारी संपुष्टात आल्यामुळे देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे होत आहे. त्यामुळे यावर्षी आपल्याला मारबत उत्सव पहायला मिळेल. मुख्यत्वेकरून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात.**

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी 1880 मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली. यानंतर 1884 मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला 142 वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला 137 वर्षे पूर्ण होत आहेत. हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही 142 वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते.हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची धरोहर म्हणावी लागेल. त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रमसुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते. मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढून येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून "ईडा-पीडा, माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत" अशा घोषणा केल्या जाते व संपूर्ण शहराती नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते. मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या



(पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते "माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत" अशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून "बडगा" काढून निषेध केला जातो. त्याचप्रमाणे महागाई, अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो. यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) सहभागी होतात. पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो. कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो. कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते.आश्चर्याची गोष्ट म्हणजे 1897 मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर 1928 मध्ये नागपूरात हिंदू-मुस्लिम दंगल मोठ्या प्रमाणात भडकली होती. तरीही या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही. परंतु मागील 2 वर्षात करोना महामारीने पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण केले. परंतु यावर्षी करोना महामारी संपुष्टात आल्यामुळे देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे होत आहे. त्यामुळे यावर्षी आपल्याला मारबत उत्सव पहायला मिळेल. मुख्यत्वेकरून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ, पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे,पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज,भ्रष्टाचारी, करोना व्हायरस इत्यादींसह शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील130 कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की यांच्यामुळे देशात महागाईचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील 130 कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत.

# सत्यशोधक समाज : शोध आणि बोध

आधुनिक केसरी

**सत्यशोधक समाज हे महात्मा फुले यांचे खरे स्वप्न होते. रुढीग्रस्त समाजाचे जुने फेकून नव्या विचारांची पेरणी करणे म्हणजे शूद्रातिशूद्राच्या सामाजिक, धार्मिक, मानसिक गुलामगिरीचे निर्मूलन करण्यासाठी खंबीरपणे उभे राहणे, हा ध्येयवाद सत्यशोधक समाजाने स्वीकारला होता. प्रार्थना समाज, आर्य समाज किंवा तत्सम मंडळींचे कार्य आपापल्या मर्यादेत वाटचाल करीत होते. आक्रमक आणि कठोर उपाय या समाजाला स्वीकारता आला नाही. त्यामुळे ब्राह्मणी किंवा विविध प्रकारच्या शोषण करणाऱ्या सामाजिक संस्थांच्या विरुद्ध ते समाज परिणामाची पर्वा न करता धडाडीने उभे राहिले नाहीत. सत्यशोधक समाजाने मात्र कोणाच्या रागालोभाची पर्वा केली नाही. जातिभेद अस्पृश्यांचा छळ, शेतकऱ्यांची पिळवणूक, धार्मिक बेबंदशाही अडलेल्या नडलेल्यांची नाडवणूक, बेताल पुरोहितशाही याविरुद्ध कृतिरूप संघर्ष केला. प्रसंगी कोर्टकचेच्या झाल्या; परंतु समाजाला नवी अर्थवत्ता आणि सामाजिक लोकशाहीचे भान देण्यासाठी उभारलेला लढा विझला नाही.**

महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली. 'सत्यशोधक समाज स्थापना दिवस' हा पारंपरिक भिक्षुकशाही धर्मशास्त्राच्या तुरुंगातून आणि धर्ममार्तंड दलालांच्या छळवादी षडयंत्रातून मुक्त होण्याचा संघटनात्मक संदेश देणारा, धर्माच्या आधारावर दडपत असलेल्या मनांना निःसंकोच हुंकार देणारा दिवस आहे. आधुनिक काळातील भारतीय समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक पुनर्रचनेचे जोतीराव फुले हे कुशल शिल्पकार होते. याबाबतचे त्यांचे सर्वच पातळ्यांवरील कार्य हे वादातीत आहे. सर्वार्थाने वंचित समाज आणि त्यांचे सहप्रवासी या दिवसापासून अधिकाधिक निकट येण्यास धजावू लागले. नव्हे; तर संघटित होऊ लागले आणि त्याद्वारे एका ठिकाणी जमा होऊन विचारमंथनासह संघर्षशीलतेसही सज्ज होऊ लागले. विचार केंद्रस्थानी ठेवून सामूहिक प्रयत्नांद्वारे चळवळ उभी करता येऊ शकते, या विचारांपर्यंत सत्यशोधक समाजाचे महत्त्व विश्वव्यापी ठरले. चळवळ आली म्हणजे ती एका विशिष्ट विचाराने, ध्येयाने, तत्त्वज्ञानाने प्रवासास निघालेली असते. अशा एका विशिष्ट ध्येय, विचारांशिवाय चळवळ गतिमान होऊच शकत नाही. जोतीराव फुलेंकृत चळवळीचा विचार प्रगल्भ, तितकेच ध्येयही निकोप आणि बलदंड होते. आधुनिक काळातील माणसाची मांडणी महात्मा बुद्धांच्या तत्त्वज्ञानामधून उगम पावत, जोतीराव फुले यांच्या चळवळीच्या मार्गाने पुढे जात तिचे शेवटचे टोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र लढ्यात आणि चळवळीत येऊन मिसळते.

समाज क्रांतिकारक जोतीराव फुले यांच्या हयातीत सत्यशोधक समाजाची चळवळ गतिमान होतीच, ती त्यांच्या निर्वाणानंतरच्या काळातही तशीच गतिमान असल्याचे आपणास दिसते. वर्ग-जातविरहित समाजाच्या निर्माणाची धारणा जोतीराव फुलेंची होती. भारतीय समाज एका सरळ रेषेत असावा, असे त्यांना मनोमन वाटे. सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे रूपांतर पुढे ब्राह्मणेत्तर चळवळीत झाले, ही बाब सर्वांना विदितच आहे; परंतु वास्तव असे आहे की, ब्राह्मणेत्तर चळवळीला जोतीराव फुले यांचे विचार व्यवहार आणि आचरणांच्या पातळीवर पचवता आलेले नाहीत. याला काही सन्माननीय अपवाद निश्चित होते आणि आजही आहेत, नाही असे नाही. अनुयायांना विचार झेपला तर चळवळ सशक्त करता येते. शिवाय, दिशा निश्चितीही करता येते. विचारांवर साधकबाधक चर्चा करून चळवळ सर्वांगाने कळली म्हणजे ध्येयापर्यंत पोहोचणे सहज शक्य होत असते. ब्राह्मणेत्तर चळवळीने यासंबंधात काही महत्त्वपूर्ण बाबींकडे दुर्लक्ष केल्याने या चळवळीला यश कमी आणि अपयश अधिक पत्करावे लागले.

सुरेश साबळे
बुलडाणा मो. 9850380598

अशा या सामाजिक, सांस्कृतिक पृष्ठभूमीवर प्रज्ञावंत डॉ. बाबसाहेब आंबेडकरांची आत्माभानासह समाजभान देणारी सम्यक समग्र बदल मागणारी चळवळ गतिमान झाली. जर कदाचित ब्राह्मणेत्तर चळवळीच्या मंडळींनी दूरदृष्टीने आंबेडकरी चळवळीला निःसंकोच सहकार्य केले असते, तर आजच्या महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचा आलेख फारच वैविध्यपूर्ण आणि विकसित दिसला असता. पुढे ब्राह्मणेत्तर चळवळीच्या बहुतांश कार्यकर्त्यांनी राजकीय आश्रय घेतला. त्यामुळे साहजिकच सांस्कृतिक व सामाजिक प्रश्नांना गौण स्थान आले. यातून ब्राह्मणेत्तर चळवळीत बरेच चढ-उतार आले. त्यामुळे कार्यकर्ते गोंधळून गेले. नंतरच्या काळात जोतीराव फुले यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक विचार स्पष्ट आणि नितळपणे समाजाला कळले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीमुळेच.

समग्र समाजाच्या सर्वांगीण प्रश्नांचा परामर्श घेत त्यांचे निराकरण करणाऱ्या चळवळीचे नाव फुले-आंबेडकरी चळवळ पडले. या चळवळीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर थोडेबहुत सामाजिक प्रश्न हाताळले. मात्र, चळवळीचे बहुतांश लक्ष राजकारणाकडे वळल्याने सामाजिक-सांस्कृतिक प्रश्नांना येथेही गौणत्वाचा क्रम मिळाला. जे ब्राह्मणेत्तर चळवळीत झाले तेच पुन्हा दलित चळवळीनेही केले. १९६० च्या दशकात महाराष्ट्रात अनेक सामाजिक-सांस्कृतिक संघटनांनी अत्यंत तडफेने आणि जागरूकतेने सामाजिक जनजागृतीची पेरणी केली. त्याद्वारे बदलत्या सामाजिक मनाची स्पंदनं या संघटनांनी शब्दांकित केली. समाजातील पारंपरिक वाईटांवर कठोरपणे आघात केले. लोकशाही मूल्यांचे अर्थ जनसामान्यांपर्यंत नेले.

समाजपरिवर्तनाच्या चळवळीला गतिशील ठेवत माणुसकीच्या अर्थाला आकार देण्याचे कार्य या काळात निष्ठेने आणि निकराने केले गेले4चे आकर्षणही कमी कमी होत गेले. मला वाटते यासाठी कार्यकर्त्यांची निष्ठा जबाबदार असावी, हे शांतपणे आणि नम्रपणे समजून घेतले पाहिजे. कारण, कोणत्याही चळवळीच्या कार्यात शिथिलता आली म्हणजे समजून घ्या की, एकतर कार्यकते बेजबाबदारपणे वागले किंवा कार्यकत्यांच्या निष्ठा ठिसूळ होत्या. ठिसूळ निष्ठा आशयाला गिळंकृत तर करतातच. शिवाय, कार्यकत्यांमध्ये बेबनावही आणतात. यासाठी कार्यकत्यांच्या विचारनिष्ठा आणि प्रामाणिकपणा या बळावरच त्या चळवळीच्या वैभवाचे शिखर अवलंबून असते.

सत्यशोधक समाजाचा विस्तार आणि विकासाबाबत भारत देशातला पुरोगामी व परिवर्तनशील माणूस कमालीचा आशावादी होता. जोतीराव फुले यांच्या आद्य चरित्रग्रंथांच्या १ जुलै १९२७ रोजीच्या प्रस्तावनेत अमरावतीच्या मोर्शीचे थोर सत्यशोधक अँड. नारायणराव अमृतकर म्हणतात की, 'महात्मा जोतीराव फुलेंच्या सत्यशोधक तत्वांचा आज महाराष्ट्र, मद्रास, बऱ्हाड, मध्य प्रांत बंगाल, बिहार, ओरिसा इत्यादी भारताच्या सर्व प्रांतांत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जोराने प्रसार होत आहे. जोतीराव हे गरीब स्थितीतूनच स्वतः शिकलेले स्वयंप्रकाशित दीनमणी होते. हिंदुस्थानची सर्वांगीण उन्नती जर कशाने होणार असेल, तर ती त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वप्रसारानेच होणार आहे, यात तिळमात्र संदेह नाही.' वरील विधानाचा अर्थ आणि अन्वयार्थ आजच्या काळात लावावयाचा झाल्यास आजच्या सत्यशोधकांसमोरील विविध आव्हानांना सामोरे जात आपल्या विचार-आचारात कृतिशीलता आणावी लागेल. त्यासाठी जोतीराव फुले यांना अपेक्षित समाज घडविताना खबरदारी घेत नव्या आशयाशी बांधत सत्यशोधक जलशाचे पुनरुज्जीवन करावे लागेल. धर्म आणि जातीच्या कडवेपणाविरुद्ध झुंजत, समाजसन्मुखता बनवत केशवराव विचारे, भाई माधवराव बागल, मुकुंदराव पाटील, भास्करराव जाधव, बी. जी. लाड, प्रबोधनकार ठाकरे, आनंद स्वामी, रा. ना. चव्हाण, माजी आमदार रायभान जाधव, सत्यशोधक व्यंकटराव अण्णा रणधीर, नागनाथ आण्णा नायकवडी, प्राचार्य गजमल माळी, डॉ. रामप्रसाद तौर, डॉ. जी. ए. उगले, डॉ. डी. आर. शेळके, रावसाहेब ढवळे, प्रा. श्याम मुडे, चंद्रपूरचे डॉ. एकनाथराव साळवेंसारखी आदर्श उदाहरणं समाजासमोर ठेवावी लागतील. समाज धर्मनिष्ठेसह बुद्धिनिष्ठ व्हावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आवश्यक असतील.

सत्यशोधक समाजाची गतिशीलता ही कार्यकर्त्यांच्या विचारनिष्ठा आणि प्रामाणिक वर्तनावर अवलंबून असेल. नाही तर एकच कार्यकर्ता कम् नेता इथे कम्युनिस्ट, दुसरीकडे सत्यशोधक, तिसऱ्या ठिकाणी शिवधर्मीय, तर चौथ्या ठिकाणी अखिल भारतीय मराठा महासंघाचा कट्टर स्वयंसेवक. कारण, आजकाल अनेक बाद एकाच वेळी वेगवेगळ्या खिशांत घेऊन फिरणारांची संख्या कमी नाही. समोर जशी व्यक्ती येईल त्याचे समर्थन करून आवश्यक तो बाद खिशातून काढायचा आणि चर्चा सुरू. यामुळे चळवळीला खीळ बसते, चळवळ दुबळी होऊन विकलांग होते. चळवळ गतिशील ठेवण्यासाठी कशाला महत्त्व द्यायचं, याचा अंदाज कार्यकर्त्यांजवळ असणे आवश्यक असते. परिवर्तनवादी चळवळीचा पूर्वानुभव आणि इतिहास विचारात घेता समस्त पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीच्या सहकार्याचा हात हातात घेऊन सत्यशोधक समाजाच्या चळवळीला गतिशीलता देण्याची आज गरज निर्माण झाली आहे. सोबत करणारे परिवर्तनवादी प्रामाणिक असले म्हणजे बदलत्या काळाला अनुरूप गतिशीलता सहज प्राप्त होत असते.

एखादा सुधारक हा आपल्या काळात परिवर्तनवादी असतो. काळात मात्र तो परिवर्तनाच्या प्रक्रियेत अडसर ठरण्याचा धोका संभवतो. पण, नंतरच्या भारतातील सर्वच संत आपापल्या काळात परिवर्तनवादी होते, असेही नाही. त्यापैकी बहुतांश परिस्थितीशी जुळवून घेणारेही होते. पण, आजच्या संदर्भात मात्र काहीचा अपवाद वगळता त्यांचे विचार फारसे उपकारक ठरत नाहीत. केवळ श्रद्धेपोटी एखाद्याचे विचार हे कालातीत असतात, असे समजणे खूपच अडचणीचे ठरत असते. अशा व्यक्तींचे स्मरण वगैरे ठीक असते. पण, ओढून-ताणून त्यांना आजच्या संदर्भातदेखील श्रेष्ठ सिद्ध करण्याचा आततायीपणा करण्यात कसलाच अर्थ नसतो. त्या त्या मंडळींनी जे कार्य केले,



त्याची जाणीव ठेवणे वेगळे, आजही त्याचे औचित्य सिद्ध करणे वेगळे आणि म्हणूनच एखाद्या निमित्ताने अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज असते. महात्मा फुले यांच्या विचाराचा सत्यशोधक समाज आणि प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सत्यशोधक समाजाविषयीचे विचार आणि भूमिकेचा शोध घेत असताना अशा बाबींचे महत्त्व अधिक वाढते.

समग्र मानवी कल्याणाचा हेतू हाच सत्यशोधक समाजाचा हेतू असल्यामुळे जातिधर्मातीत मूल्यांची निर्मिती सत्यशोधक समाजाच्या मुळाशी होती. महात्मा फुले यांच्यानंतर सत्यशोधक सत्ताशोधक झाले असले आणि ते क्षणभर मान्य केले, तरी सत्यशोधनासाठी जोतीराव फुलेंच्या या समाजाने जो फुले यांच्या काळी दैनंदिन ध्यास घेतला होता, तो एका व्यापक जाणिवेचाच होता. काल्पनिकतेकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करून नवसमाजनिर्मितीची 'सत्यशोधक समाजाची प्रेरणा मुळातच मानवी समतेच्या आणि स्वातंत्र्याच्या विश्वव्यापी जाणिवेने भारलेली होती. एकाच कुटुंबात विभिन्न धर्माची मागत गुण्यागोविंदाने नांदावीत, ही सत्यशोधक समाजाची भूमिका मानवतावादी होती. याद्वारे जोतीराव फुले यांना नवा परिवर्तनशील समाज निर्माण करावयाचा होता. म्हणून फुले यानी 'गुलामगिरी' या ग्रंथात 'परंपरागत समाज नष्ट करा, हा मंत्र देत त्याला पर्याय म्हणून स्थापन करावयाची व्यवस्था व आधारभूत तत्वे हा विचार सत्यशोधक समाजाद्वारे अपेक्षिला होता.

महात्मा जोतीराव फुले यांच्या मते कुणावरही धर्म स्वीकारण्याची सक्ती असू नये. कुटुंबातील ग्रंथ वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तो ध स्वीकारावा. तिच्या पतीने 'बायबल' ग्रंथ वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे वाटल्यास ख्रिस्ती व्हावे व त्याच कुटुंबातील कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास महंमदी व्हावे. त्या कुटुंबातील मुलाने सार्वजनिक सत्यशोधक समाज ग्रंथ वाचून त्यांच्या मर्जीप्रमाणे असल्यास सत्यधर्मी व्हावे. हा सर्वधर्म समभाव असणारा मानवधर्म त्यांना प्रिय होता.

महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज सत्यवर्तन करणारा. परिवर्तन आपले आपणच करायचे असते. ज्ञान व विज्ञाननिष्ठ नवा विचार समाजाला नव्या प्रकाशमय जगाकडे घेऊन जाण्याचे स्वप्न दिले होते. जोतीराव फुले सतत म्हणत की, मी स्वतः धर्म संस्थापकही नाही, तर एक सत्यशोधक आहे. हीच बाब यापूर्वी तथागतांनीही नोंदविली होती. ते म्हणतात की, मी म्हणतो म्हणून माझे म्हणणे तुम्ही ऐकू नका. तुम्हाला पटते का? ते आधी ठरवा. नंतर आचरण करा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले तीन गुरू मानले. त्यात तथागत, कबीर आणि जोतीराव फुले. सिद्धांत, आचरण आणि व्यवहाराच्या पातळीवर त्यांना बाबासाहेबांनी गुरू म्हणून मान्य केलेले दिसून येते. पारंपरिक अथमि डॉ. आंबेडकरांनी 'कानफुके' गुरू केलेले नाहीत, तर हजारो वर्षांची दूरदृ आणि मानवहिताचा विचार ज्यांच्या ठायी सामावलेला आहे, अशांचे गुरुत्व स्वतःहून स्वीकारलेले आपणास दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिष्यत्व स्वीकारताना जनकल्याण, मानवहित आणि नवसमाजनिर्मितीचे स्वप्न पाहणारे सिद्धांत, तत्त्वे अंगीकारली आणि अनावश्यकतेकडे नजर जाऊ दिली नाही. वाचक आणि अभ्यासकांनी 'निर्मिक' ही संकल्पना त्या-त्या काळाची मर्यादा ओळखून अभ्यासली पाहिजे अथवा विश्लेषण करायला पाहिजे. उगाच त्या शब्दाचा बाऊ करू नये, असे यानिमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते.

महात्मा फुले यांच्यानंतरच्या काळात सत्यशोधक समाजाचे अनेक कार्यकर्ते अत्यंत समर्पित भावनेने कार्यरत होते; परंतु साधारणतः महाराष्ट्राच्या खानदेशातील फैजपूर काँग्रेस अधिवेशनात बहुतेक सत्यशोधक काँग्रेसवासी झाले आणि त्यांचा सत्यशोधकाचा धर्म 'सत्ताशोधक' झाला. नंतरच्या काळात मात्र काही सन्माननीय अपवाद वगळता बहुतेकांनी केवळ एक सामाजिक सन्मान म्हणून मिरविण्यासाठी 'सत्यशोधक' हे बिरुद आपल्या नावापुढे लावून फिरत राहिले. परिणामी निमेने काम करणाऱ्या सत्यशोधक मंडळींकडे बंचिततेची अवस्था आली.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काळाच्या कसोटीवर न टिकणाऱ्या बाबींना टाळताना गुरुत्वाला तसूभरही धक्का लागू दिलेला नाही. वास्तविकतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःहून स्वीकारलेले तीनही गुरु, हयात नसलेले स्वीकारलेले आहेत. तेही केवळ सिद्धांत आणि आचार-विचारांच्या पातळीवर विज्ञाननिष्ठ मनोविश्लेषक तथागतांना त्यांनी स्वीकारले आणि अनुसरलेसुद्धा. तसेच कबीर आणि जोतीराव फुले यांना स्वीकारताना बुद्ध, कबीर, जोतीराव फुले यांच्या स्वप्नातील 'समाजमन' आणि सामाजिक व्यवहार वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला. भलेही मग त्यासाठी विविध प्रकारचे लेखन, चिंतन आणि मनन करून भारत देशासाठी स्वतंत्र संवैधानिक समाज संस्कृती भारतीय संविधानाद्वारे हरएक भारतीय नागरिकांप्रति समर्पित केली. म्हणजे तथागत बुद्ध आणि महात्मा फुले यांच्या स्वप्नातील सत्यशोधक समाजाला वास्तवतेचा आकार देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'भारतीय संविधाना'चा यशस्वी उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते यशस्वीही झाले. महात्मा फुले यांच्या समाजपरिवर्तनाचा आणि नवसमाज उभारणीच्या ध्येयवादाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जोतीराव फुले यांच्यानंतरच्या कालखंडात विशाल मानवतेच्या आणि इहवादी वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे संविधान संस्कृतीच्या रूपात लोकशाही मार्गाने प्रगल्भता आणि भक्कमपणा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केलेला आपणास दिसून येतो.

गौतम बुद्ध एके ठिकाणी शिष्य अनुयायांना सांगतात की, 'तुमचे प्रश्न तुम्हाला सोडवता आले पाहिजेत. जो-जो कोणी काही सांगतो त्यावर तुम्ही विचार करा. तुमच्या विवेकशक्तीने त्यावर मंथन, मनन करा. नंतरच ठरवा की, सांगणाऱ्याने जे सांगितले आहे ते बरोबर की चूक? जी गोष्ट तुमच्या विचारशक्तीला, तुमच्या तर्कशक्तीला पटत असेल तर तुम्ही ती खरी माना. नाही तर तुम्ही त्याकडे खुशाल दुर्लक्ष करा.'

तथागतांच्या या म्हणण्याचा अर्थ अगदी स्पष्ट आणि साधा सरळ आहे की, प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य आहे. पण, त्या विचारस्वातंत्र्याचा उपयोग त्याने सत्यशोधनासाठी केला पाहिजे आणि सत्य म्हणजे तरी काय? तर सत्य हेच आहे की, मनुष्याच्या पंचज्ञानेंद्रियांना व पंचकर्मेंद्रियांना ते सत्य पटले पाहिजे.. म्हणजे सत्य पाहता आले पाहिजे, ऐकता आले पाहिजे, त्याचा वास घेता आला पाहिजे. त्याचा सुवास घेता आला पाहिजे व त्याच्या अस्तित्वाबद्दल आपल्याला साक्ष पटविता आली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अनुयायांना सांगतात की, तथागतांनी सांगितलेली हीच ध्येये आपले उद्दिष्ट ठरवून वाटचाल केली पाहिजे. १) सत्य शोधून काढणे २) जो धर्म आपल्याला मानवता शिकवील त्याच धर्माचे अनुसरण करणे. आधुनिक विचारांची प्रणाली कोणत्या दिशेने वाहते आहे, त्या अनुरूप सत्य शोधून काढणे; जो सांगतो, तोच 'सत्यधर्म' होय. सत्य आणि सत्ता या परस्परविरोधी गोष्टी आहेत. शास्त्रसुद्धा कोणत्याही गोष्टीची परिपूर्णतः मान्य करीत नाहीत म्हणून सत्यसुद्धा कालपरत्वे अपूर्णच असल्याने त्याचा पुनःपुन्हा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. म्हणूनच जगामध्ये पूर्णतः पवित्र असे काहीच नाही. धर्म म्हणजे सत्य आहे, हे आम्ही शिकले पाहिजे. आपण केव्हाही इतरांना दुखविता कामा नये, हीच सत्य धर्माची खरी शिकवण असली पाहिजे. सत्य शोधण्याच्या कामात माणसाला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सत्यशोधक समाजाविषयी प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अशा रीतीने अगदी सुस्पष्ट आणि सकारात्मक भूमिका होती.

# बहुमुखी प्रतिभेचा कलावंत : सावनकुमार टाक



आधुनिक केसरी

हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक, गीतकार आणि लेखक सावनकुमार टाक यांचे गुरुवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीतील एक बहुमुखी प्रतिभेचा कलावंत काळाच्या पडद्याआड गेला आहे. ८० च्या दशकात सावन कुमार टाक यांनी अनेक लोकप्रिय चित्रपटांची निर्मिती केली. जवळपास चार दशकांहून अधिक काळ त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत स्वतःचा वेगळा ठसा उमटवला. आपल्या चार दशकांहून अधिक काळ चाललेल्या कारकिर्दीत त्यांनी संजीव कुमार यांच्या पासून सलमान खान यांच्यापर्यंत सर्वच कलाकारांबरोबर काम केले होते. नैनिहाल हा सावन कुमार यांनी निर्मित केलेला पहिला चित्रपट होता या चित्रपटात संजीव कुमार यांनी महत्वाची भूमिका साकारली होती. सावन कुमार टाक यांनी १९७२ साली मीना कुमारी यांच्यासारख्या कसलेल्या अभिनेत्रीला सोबत घहेउन पहिला चित्रपट दिग्दर्शित केला. त्या चित्रपटाचे नाव होते गोमती के किनारे. सावन कुमार टाक यांनी संजीव कुमार, मीना कुमारी यांच्याशिवाय राजेश खन्ना, जितेंद्र, जयाप्रदा, पद्मिनी कोल्हापूरे, नितु सिंग, शत्रुघ्न सिन्हा, सलमान खान यांच्यासोबतही काम केले. त्यांनी निर्मिती आणि दिग्दर्शित केलेले सबक, हवस, गोमती के किनारे, सजन की सहेली, सनम बेवफा, बेवफा से वफा, खलनायिका, माँ, सलमा पे दिल आ गया, सनम हरजाई, साजन बिन सुहागण, बेटी, चांद का तुकडा, सौतन, सावन यासारखे अनेक चित्रपट लोकप्रिय झाले. ते आपल्या चित्रपटात नेहमीच नव्या कलाकारांना संधी देत. त्यांच्यामुळेच हिंदी चित्रपट सृष्टीला अनेक उत्तमोत्तम कलाकार मिळाले. त्यांच्या चित्रपटात मनोरंजनासोबत सामाजिक संदेशही दिला जात. त्यांचे अधिकतर चित्रपट हे महिलांवर आधारित होते. सावन कुमार टाक हे निर्माता दिग्दर्शक म्हणून ओळखले जात असले तरी ते उत्तम गीतकार होते. त्यांच्या चित्रपटातील गाणी मधुर असत. त्यांचा सौतन हा चित्रपट तर केवळ गाण्यांमुळे गाजला. शायद मेरी शादी का खयाल ... हे सौतन चित्रपटातील गाणे त्या काळी खूप गाजले. जिंदगी प्यार का गीत है.... हे गाणे देखील त्या काळात खूप गाजले. हवस चित्रपटातील 'तेरी गलिओ मे ना रखेंगे कदम.....हे गाणे देखील खूप गाजले. हृतिक रोशनच्या काहो ना प्यार है या चित्रपटात देखील त्यांनी काही गाणी लिहिली आहे. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची खूप मोठी हानी झाली आहे. बहुमुखी प्रतिभेची देणगी लाभलेल्या सावन कुमार टाक यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**-श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे,**
**संपर्क क्र. 9922546295**

# निवडणूक: समज गैरसमज



प्रा.श्रावण देवरे
संपर्क क्र. 8830127270

आधुनिक केसरी

**निवडणूक लढविण्यासाठी पैसा लागतो, हे मिथक ज्यांनी निर्माण केले, ते त्यांच्या निवडून येण्याचे रहस्य समाजापासून लपवीत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. कोणीही व्यक्ती निवडून येण्यामागचे खरे रहस्य समाजावरचा एकूण 'वैचारिक प्रभाव' आहे. ज्या विचारांचा प्रभाव समाजावर अधिक असतो, त्या विचारांच्या व्यक्ती निवडून येत असतात व सत्ताही त्याच विचारांच्या पक्षांकडे जाते. परंतू एखाद्या विचारांचा प्रभाव समाजात निर्माण व्हावा म्हणून चळवळ उभी करावे लागते. स्वातंत्र्य चळवळीच्या प्रभावातून टिळाकांनी वैदिक-ब्राह्मणी विचारांचा प्रभाव समाजात निर्माण केला. टिळकानंतर आलेल्या गांधीवादानेही हाच ब्राह्मणी विचार बहुजन समाजावर बिंबवला. जोवर समाजावर गांधीवादाचा प्रभाव होता तोवर भारतावर कॉंग्रेस एकहाती सत्ता गाजवीत होती. गांधीवादाची कट्टरता स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या पहिल्या पिढीपर्यंत कायम होती.**

''ओबीसी राजकीय आघाडी'' स्थापन केल्यापासून पुरोगामी चळवळीतील अनेक नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी व बुद्धीजीवींशी चर्चा झाल्यात. रोज 2-4 फोन या विषयावर चर्चा करणारे असतातच! आजच ल.सा.क.स. संघटनेचे पुणे येथील प्रा. दशरथ अवचारे यांचा फोन आला. त्यांनी फोनवर काही मुद्दे उपस्थित केलेत. मी त्यांना म्हणालो की याविषयावर मी स्वतंत्रपणे एक लेख लिहितो आहे.

ओबीसी राजकीय आघाडीतर्फे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येत्या निवडणूकांमध्ये उमेदवार उभे करण्यासंबंधात आमचे प्रयत्न सुरू आहेत.

निवडणूक म्हटली की समोरून पहिला प्रश्न उपस्थित होतो- पैसा कुठून आणणार? कारण कोणतीही निवडणूक लढवायची म्हटल्यानंतर पैसा हा लागतोच, असा सोयिस्कर गैरसमज पसरविण्यात आलेला आहे, त्यामागील उद्देश काय तो आपण समजून घेतला पाहिजे.

समाजातील गरीब व मध्यमवर्गीय व्यक्तीने आपल्या निवडणूक स्पर्धेत येऊच नये, असा प्रयत्न धनदांडगे व जातदांडगे करीत असतात. शुद्रादिअतिशुद्र जाती-जमातीतून कुणी राजकीय स्पर्धक निर्माण होउ नये यासाठी डोळ्यात तेल घालून काळजी घेतली जाते. 'निवडणूक लढविण्यासाठी पैसे लागतात', हे मिथक जाणीवपूर्वक दलित+ओबीसी जातींच्या माथी मारण्यात आलेले आहे. 'निवडणूक लढणे आपले काम नाही', अशी शरणागती पत्करत शूद्रअतिशूद्र जातींनी हे मिथक स्विकारलेले आहे.

निवडणूक लढविण्यासाठी पैसा लागतो, हे मिथक ज्यांनी निर्माण केले, ते त्यांच्या निवडून येण्याचे रहस्य समाजापासून लपवीत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

कोणीही व्यक्ती निवडून येण्यामागचे खरे रहस्य समाजावरचा एकूण 'वैचारिक प्रभाव' आहे. ज्या विचारांचा प्रभाव समाजावर अधिक असतो, त्या विचारांच्या व्यक्ती निवडून येत असतात व सत्ताही त्याच विचारांच्या पक्षांकडे जाते. परंतू एखाद्या विचारांचा प्रभाव समाजात निर्माण व्हावा म्हणून चळवळ उभी करावे लागते. स्वातंत्र्य चळवळीच्या प्रभावातून टिळाकांनी वैदिक-ब्राह्मणी विचारांचा प्रभाव समाजात निर्माण केला. टिळकानंतर आलेल्या गांधीवादानेही हाच ब्राह्मणी विचार बहुजन समाजावर बिंबवला. जोवर समाजावर गांधीवादाचा प्रभाव होता तोवर भारतावर कॉंग्रेस एकहाती सत्ता गाजवीत होती. गांधीवादाची कट्टरता स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या पहिल्या पिढीपर्यंत कायम होती. त्यामुळे 1965 पर्यंत कॉंग्रेसची एकहाती सत्ता अबाधित राहीली. स्वातंत्र्यानंतरच्या दुसऱ्या पिढीपासून ही गांधीवादाची कट्टरता ढिली पडायला लागली. त्यामुळे अनेक राज्यात कॉंग्रेसची सत्ता डळमळू लागली.

गांधीवादाची कट्टरता कमी का झाली? त्याचेही कारण वैचारिकच आहे. गांधीवादाला शह देण्यासाठी समाजवाद, मार्क्सवाद ही वर्गीय तत्वज्ञाने चळवळीतून पुढे आलीत. या वर्गीय तत्वज्ञानाच्या आधी टिळक-सावरकारांच्या ब्राह्मणवादाला शह देण्यासाठी फुले-आंबेडकरांचे जात्यंतक 'अब्राह्मणी' तत्वज्ञान पुढे आले. तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुलेंच्या सत्यशोधक चळवळीने राजकीय वळण घेत 'ब्राह्मणेतर पक्षाचे' रूप घेतले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यताविरोधी चळवळीने राजकीय वळण घेत 'स्वतंत्र मजूर पक्ष' व 'शेड्युल कास्ट फेडरेशन' हे पक्ष स्थापन झालेत. दक्षिणेत मद्रास प्रांतात तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुलेंच्या जात्यंतक अब्राह्मणी तत्वज्ञानाने राजकीय वळण घेत 'द्रविड मुन्नेत्र कळघम' पक्ष निर्माण झाला. त्यानंतर 1985 च्या काळात कांशीराम साहेबांनी जात्यंतक आंबेडकरवादाला राजकीय वळण देत 'बहुजन समाज पक्ष' निर्माण केला. 1920 ते 1930 या दशकात ब्राह्मेतर पक्षाने टिळक-सावरकरांच्या ब्राह्मणावादाला सांस्कृतिक आव्हान दिले व राजकीयदृष्ट्याही जेरीस आणले.

**(पूर्वार्ध)**

परंतू जमीनदार-सरंजामदार मराठ्यांनी सत्तेच्या लालसेपोटी शॉर्टकट स्वीकारीत ब्राह्मेतर पक्षाला कॉंग्रेसी गांधीवादात विलीन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे गांधीवादाला यशस्वीपणे शह दिला. 1936 सालच्या निवडणूकीत त्यांनी 15 पैकी 13 उमेदवार निवडून आणलेत. परंतू यशस्वी ठरलेल्या जात्यंतक वर्गीय तत्वज्ञानाचा त्याग करीत बाबासाहेबांनी शूद्ध जात्यंतक तत्वज्ञान स्वीकारल्यामुळे यशस्वी होत असलेला स्वतंत्र मजूर पक्ष नष्ट केला व शूद्ध जातीच्या आधारावरचा शेकाफे स्थापन केला. त्यामुळे ते पुढील निवडणूकीत पराभूत झालेत. त्यानंतर मार्क्सवाद्यांनी कॉंग्रेसी गांधीवादाला आव्हान दिले, त्यांची सत्ता पश्चिम बंगाल व केरळमध्ये आली. परंतू शूद्ध वर्गवादाच्या नादात जातीव्यवस्थेचे आव्हान न स्वीकारल्यामुळे हे क्रांतीकारक पक्ष आज नेस्तनाबूत होतांना दिसत आहेत. त्यानंतर कांशिराम साहेब ब्राह्मणवादाला शरण गेलेत व आपला बहुजन समाज पक्ष त्यांनी संघ-भाजपात विलीन केला.



समाजवाद्यांनीही कॉंग्रेसी गांधीवादाला चांगला शह दिला. राम मनोहर लोहीयांनी ओबीसी चळवळीशी युती करीत काहीअंशी जात्यंतक धोरण स्वीकारले. त्यातून बिहार व उत्तरप्रदेशासारख्या कळीचे महत्व असलेल्या राज्यातून त्यांनी क्रांतीकारक ओबीसी नेते निर्माण केलेत व सत्ताही मिळवली. परंतू ब्राह्मणवादाला सांस्कृतिक आव्हान न दिल्यामुळे हे पक्षही आता शूद्ध एकजातीयवादाला बळी पडत आहेत व त्यामुळे सत्तावंचित होत आहेत.

उपरोक्त चर्चेतून तीन निष्कर्ष पुढे येतात. पहिला निष्कर्ष हा की, ब्राह्मणवादाला यशस्वीपणे शह द्यायचा असेल तर ओबीसी नेतृत्वच हवे. दुसरा निष्कर्ष असा की, हे ओबीसी नेतृत्व वैचारिक चळवळीतूनच घडवले गेले पाहिजे. लालु-मुलायमसारखे ओबीसी जातीतून आलेले हे वैचारिक नेतृत्व आजही ब्राह्मणवादासमोर राजकीय आव्हान उभे करीत आहेत. कांशिरामसाहेब, रामविलास पास्वान साहेब व आठवले साहेब ज्या पद्धतीने क्रांतीकारी आंबेडकरवादाकडून संघ-भाजपाच्या ब्राह्मणवादात विलीन झाले आहेत. या पार्श्वभूमीतून विचार करता वैचारिक ओबीसी नेतृत्व आजही स्वाभीमानाने ताठ मानेने उभे आहेत व संघ-भाजपाच्या ब्राह्मणवादाला शह देत आहेत, ही निश्चितच अभिमनाची बाब मानली पाहिजे. तिसरा निष्कर्ष असा निघतो की, या वैचारिक ओबीसी नेतृत्वाखालील चळवळीने ब्राह्मणवादाला यशस्वीपणे शह देण्यासाठी 'अब्राह्मणी सांस्कृतिक' संघर्ष उभा केला पाहिजे. हे तीन निष्कर्ष वैचारिक धोरण म्हणून स्वीकारलेत, तर त्याचा काय परिणाम होतो, हे आपल्याला तामीळनाडूमध्ये पाहायला मिळते.

मद्रास प्रांतातील सामी पेरियार यांनी क्रांतीकारकपद्धतीने ब्राह्मणवाद गाडून दाखवीला. त्याचे कारण त्यांनी उपरोक्त तीन निष्कर्ष तंतोतंत अमलात आणलेत. ते पुढीलप्रमाणे-

1) त्यांनी आपल्या जात्यंतक चळवळीतून जाणीवपूर्वक ठरवून ओबीसी नेते निर्माण केलेत.

2) त्यांनी या ओबीसी नेत्यांना फुलेप्रणित अब्राह्मणी तत्वज्ञानाने घडविले.

3) त्यांनी या ओबीसी नेत्यांच्या नेतृत्वाखाली 'अब्राह्मणी सांस्कृतिक युद्ध' छेडले.

या सर्वाचा परिणाम आपल्याला आजही दिसतो आहे. उत्तरेत लालू-मुलायम या ओबीसी नेत्यांनी ब्राह्मणी रामाच्या विरोधात अब्राह्मणी सांस्कृतिक संघर्ष उभा केला नाही, म्हणून ते आज संघ-भाजपाविरोधात कमजोर पडतांना दिसत आहेत. तर दक्षिणेत ओबीसी नेत्यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मणी रामायण-महाभारताच्या विरोधात अब्राह्मणी संघर्ष आजही आक्रमकपणे उभा असल्याने तेथे ब्राह्मणवाद गाडला गेला आहे व ब्राह्मणीपक्ष असलेले कॉंग्रेस-भाजपा नामुष्कीचे पराभूत जीवन जगत आहेत.

तत्वज्ञानावर आधारित वैचारिक चळवळीतून अनेक दरिद्री व्यक्ती निवडून आलेल्या आहेत व सत्तेतही गेलेल्या आहेत. धुळ्यासारख्या अत्यंत मागास व गरीब जिल्ह्यातून व्यंकटराव धोबी व गजमल माळींसारखे दरिद्री ओबीसी कॉंग्रेसी गांधीवादाने निवडून आणलेत. समाजवादी+ओबीसी चळवळीने कर्पूरी ठाकूरांसारखे अत्यंत अल्पसंख्य नाभीक जातीतील उमेदवार निवडून आणलेत व दोनदा त्यांना मुख्यमंत्रीही केले. सत्यशोधक चळवळीतून पुढे आलेल्या शे.का. पक्षाने भाई बंदरकर व गणपतराव देशमूख सारखे अनेक दरिद्री ओबीसी आमदार म्हणून निवडून आणलेत. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ब्राह्मणविरोधी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे परूळेकरांसारखे गरीब ब्राह्मण निवडून आणलेत. कम्युनिस्ट चळवळींनी आदिवासी भागातील अत्यंत दरिद्री उमेदवार निवडून आणलेत. कम्युनिस्ट पक्षाने रामचंद्र घंगारे (तेली-ओबीसी), भाई मंगळे (माळी-ओबीसी) असे दरिद्री लोक निवडून आणलेत. कांशीरामसाहेबांच्या बहुजन चळवळीने मायावतीसारख्या चर्मकार स्त्रीला अनेकवेळा मुख्यमंत्री बनवले. हिंदूत्ववादी विचारांच्या नावाखाली भाजप-शिवसेनेने अनेक गरीब ओबीसी व दलित-आदिवासी निवडून आणलेत. याच हिंदूत्ववादी विचारधारेने चहा विकणाऱ्या मोदींना प्रधानमंत्री बनविले व रिक्षावाल्या एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री बनविले. मद्रास प्रांतातील फुलेवादी अब्राह्मणी चळवळीने आण्णा दुराई व करूणानिधीसारखे ओबीसी मुख्यमंत्री बनवलेत. ही सर्व उदाहरणे पाहता 52 टक्के लोकसंख्या असलेल्या ओबीसी चळवळीतून ओबीसी राजकीय आघाडीतर्फे आपणही निवडणूका जिंकू शकतो, हा आत्मविश्वास आला पाहिजे.

तत्वज्ञानावर आधारित वैचारिक चळवळीतून अनेक दरिद्री व्यक्ती निवडून आलेल्या आहेत व सत्तेतही गेलेल्या आहेत.

या सर्व चर्चेतून आपला पहिला मुद्दा सिद्ध होतो. निवडणूका जिंकण्यासाठी पैसा अजिबात लागत नाही. फक्त वैचारिक चळवळीतून निवडणुका लढता येतात व जिंकताही येतात व सत्ताही काबीज करता येते. बाकी आणखीन काही मुद्दे पुढील उत्तरार्ध लेखात अभ्यासू या, तोपर्यंत जयजोती, जयभीम, सत्य की जय हो !

## नायब तहसीलदार यांच्यावरती कार्यवाही न केल्यास प्रहार जनशक्ती पक्ष करणार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** नायब तहसीलदार अविनाश अंकुश गंगापूर येथील तहसील कार्यालयात रुजू झाल्यापासून आतापर्यंत वर्ग (2) च्या जमीनीची वर्ग (1) करताना कोणत्याही सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात करण्यात आल्या तसेच राष्ट्रगीताचा अवमान केला. मुख्यालयी न राहता औरंगाबाद येथून तहसील कार्यालयाचा गाडा हाकत असल्याने यासह आदी मागण्याबाबत येत्या पंधरा दिवसांत इतर जिल्ह्यातील त्रिस्तरीय समीती गठीत करून चौकशी करून कारवाई न केल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर अंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

प्रधान सचिव मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नायब तहसीलदार अविनाश हे गंगापूर तालुक्यातील गाजगाव जन्मस्थान असून मुख्यालय गंगापूर तहसीलदार कार्यालय आहे. मात्र हे औरंगाबाद येथून दररोज येणेजाणे करून तहसील कार्यालयाचा गाडा हाकत असून शासनाची फसवणूक करून घरभाडे भत्ता उचलण्यात येत आहे. नायब तहसीलदार स्थानिक गाजगाव येथील असल्यामुळे येणाऱ्या शेतकरी व नागरिकांना अरेरावीची भाषा वापरून अपमानित करून दमबाजी करण्यात येत आहे.

गंगापूर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार अविनाश अंकुश यांनी 9 ऑगस्ट रोजी गंगापूर येथे समूह राष्ट्रगान कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रगीत सुरू असताना समोर हात बांधून उभे होते. यामुळे राष्ट्रगीताचा अवमान झाला. त्यांच्याविरोधात राष्ट्रगीताचा अवमान केल्याने पोलिसात गुन्हा दाखल करुन खात्यातून तत्काळ बडतर्फे करण्यात यावे म्हणून सामाजिक कार्यकर्ते, देशभक्त तसेच विविध संघटना पक्षांनी कारवाई करावी याबाबत विविध वर्तमानपत्रात बातम्या प्रकाशित झाल्या परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

संबंधित नायब तहसीलदार यांची चौकशी समिति गठीत करून नि पक्षपातीपणे चौकशी करावी व त्यांना गंगापूर तहसीलदार कार्यालयात करण्यात आलेल्या नियमबाह्य कामास जबाबदार धरून शासकीय अधिकारी कायद्यानुसार जास्तीची शिक्षा असलेली कारवाई करण्यात यावी, तसेच इतर जिल्ह्यातील त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात यावी. समिती गठीत झाल्यानंतर त्यांच्याकडे असलेल्या नायब तहसीलदार पदाचा पदभार काढून चौकशी पुर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येऊन पदाचा दुरूपयोग करून केलेल्या सर्व बेकायदेशीर कृत्याची येत्या 15 दिवसात चौकशी समिती गठीत करून कारवाई करण्यात यावी, नसता विभागीय आयुक्त कार्यालयासमोर अंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर ज्ञानेश्वर तोडकर, देविदास पाठे पाटील, मुसा शेख, सुलेमान पटेल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## देव्हारी येथे पोळा सण उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** येथील भागात शुक्रवारी बैल राजाचा सण पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. अल्प पाऊस, पीक परिस्थितीही फारशी समाधानकारक नसताना शेतकऱ्यांनी शेतात राब-राब राबणारा तसेच आपला खराखुरा सोबती असलेल्या बैल राजाचा पोळा सण उत्साहात साजरा केला. देव्हारी गावात दरवर्षीप्रमाणे हनुमान मंदिरावर पोळा भरला. देव्हारी गावातील शेतकरी आपल्या बैलांना सजवून हनुमान मंदिर येथे पोळ्यात घेऊन आले. येथे तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण यांच्या हस्ते सर्वप्रथम मानाची बैलाची पूजा करण्यात आली. चव्हाण वाड्यामधील परंपरागत गुढी तसेच इतरही मानाच्या गुढ्या हनुमान मंदिर येथे आणण्यात आल्या होत्या. येथे तोरण बांधण्यात आले होते. बैलाची पुजा अर्चा करून ठोंबरा वाटून तोरण तोडून पोळा फोडण्यात आला. विविध रंगबेरंगी झुला सजवून अनेक शेतकऱ्यांनी बैलांच्या शिंगांना आकर्षक रंग देवून अंगावर झुला टाकुन हनुमान मंदिर जवळ बैलांचा पोळा भरला होता. आकर्षक रंगांनी सजवून नटलेल्या वृषभराजास मोठ्या थाटामाटात शेतकऱ्यांनी पोळ्यात आणले होते. देव्हारी गावातील, सेवालाल नगरी यासह पिंपळवाडी भागातील शेतकऱ्यांनी आपले बैल वाजत गाजत पोळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी आणले होते.

**पोळा कोरडाच गेला, वरुणराजाचा अभिषेक**

देव्हारी परिसरात गेल्या काही दिवसंपासून पावसाने पुन्हा दडी मारली आहे. निदान पोळ्याच्या दिवशी वृषभराजावर वरूणराजाचा अभिषेक होईल, अशी आशा देव्हारी गातील शेतकऱ्यांना होती. मात्र ऐन पोळ्याचा दिवसही कोरडाच गेला.



## तीन वर्षाच्या मुलाच्या अपहरणाचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** सवतीच्या तीन वर्षाच्या मुलाचे अपहरण करून बिहारला पळविण्याचा प्रयत्न उधळून लावत सांगली शहर पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी मुलाची सातारा रेल्वे स्थानकावर सुखरूप सुटका केली. मुलाला पळवून नेणाऱ्या पहिल्या पत्नीसह चौघांना गजाआड करण्यात आले.

बिहारमधील शामसुंदर रवीदास यांने पहिली पत्नी बिहारमधील महूयत (ता. धरेया जि. गया) येथे असताना सांगलीतील हॉटेलमध्ये काम करणारी महिला वैशाली हिच्याशी लग्न केले होते. पतीला परत नेण्यासाठी पत्नी रेशमीदेवी, तिचे भाउ बुदन, मिथुनकुमार आणि आई वासितदेवी हे चौघेजण सांगलीत आले होते. गुरूवारी दुसरी पत्नी वैशाली हिच्या सोबत वादावादी झाली.

# मोदी सरकार शेतकरी मृत्यूचे सौदागर : देवानंद पवार

## कीटकनाशक फवारणीने 23 शेतकरी मृत्यू प्रकरण; शेतकऱ्यांना कायदेशीर लढाईसाठी स्वीस सरकारची आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** विविध देशात विक्रीस बंदी असलेल्या किटकनाशकांना भारतात परवानगी देण्यात आली. या किटकनाशकांच्या वापराने यवतमाळ जिल्हयातील 23 शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. सदर प्रकरणात महाराष्ट्र असोसिएशन ऑफ पेस्टिसाइड पॉइझन्ड पर्सन (एमएपीपीपी) तसेच पेस्टिसाइड ॲक्शन नेटवर्क इंडिया (पॅन इंडिया) या संघटनांनी शेतकऱ्यांच्या वतीने थेट स्वित्झर्लंड मधील न्यायालयात दावा दाखल केला. या प्रकरणात आता स्वीस सरकारने मानवी मुल्यांच्या आधारावर शेतकऱ्यांच्या वतीने केस लढणाऱ्यांना न्यायालयीन कामकाजासाठी लागणारा खर्च देण्याचा निर्णय घेतला आहे. एकीकडे त्यांच्याच देशातील सिजेंटा कंपनीच्या विरोधात न्यायालयीन लढाई लढण्यासाठी स्वीस सरकारने मदत देऊ केली तर तिथे बंदी असलेल्या किटकनाशकांना भारतात मात्र विक्रीची खुली परवानगी देण्यात आली आहे. अशी परवानगी देणे म्हणजे मोदी सरकारने कीटकनाशक कंपन्यांना हाताशी धरून शेतकऱ्यांच्या मृत्यूचा सौदा केला असल्याची टीका महाराष्ट्र असोसिएशन ऑफ पेस्टिसाइड पॉइझन्ड पर्सन (एमएपीपीपी) चे निमंत्रक देवानंद पवार यांनी केली आहे.



सन 2017 मध्ये किटकनाशकांचा शेतात वापर करीत असताना 23 शेतकऱ्यांचा विषबाधेने मृत्यू झाला होता. याव्यतिरीक्त जवळपास 800 शेतकरी तसेच शेतमजुर सुध्दा गंभीर बाधीत झाले होते. यासंदर्भात भारतातील सरकारने किटकनाशक बनविणाऱ्या विविध कंपन्यांविरुध्द कुठलीच ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे यवतमाळ जिल्हयात फवारणी करताना मृत पावलेल्या दोन शेतकऱ्यांच्या पत्नीच्या वतीने तसेच जखमी झालेल्या शेतकऱ्यांच्या वतीने जबाबदार किटकनाशक बनविणाऱ्या सिजेंटा या कंपनीविरुध्द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ पेस्टिसाइड पॉइझन्ड पर्सन (एमएपीपीपी) चे देवानंद पवार तसेच पेस्टिसाइड ॲक्शन नेटवर्क इंडिया (पॅन इंडिया) चे डॉ. नरसिम्हा रेड्डी यांनी जुन 2021 मध्ये सिजेंटा कंपनीचे हेडक्वार्टर असलेल्या स्वीस मधील न्यायालयात दावा दाखल केला. प्रथमता स्वीस येथील न्यायालयीन धोरणानुसार तडजोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र कंपनीने नकार दिल्याने आता ही केस न्यायालयात सुरु झाली आहे. ही केस लढणारे भारतातील रहिवासी असून अत्यंत गरीब आहे. दुसरीकडे स्वीसमध्ये केस लढताना त्यांना मोठया प्रमाणात खर्च येत आहे. त्यामुळे स्वीस सरकारने मानवी मुल्यांच्या आधारावर या केससाठी लागणारा खर्च स्वतः करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या वतीने तक्रार करणाऱ्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. हे एक न्यायालयीन प्रक्रियेतील मोठे उदाहरण आहे. आम्हाला या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे. ज्यांनी आतापर्यंत स्वीस न्यायिक व्यवस्थेचे दरवाजे ठोठावण्याचे स्वप्न पाहिले नाही त्यांनाही यामुळे प्रोत्साहन मिळणार आहे. या यशामुळे आमचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास वाढल्याची प्रतिक्रिया डॉ. नरसिम्हा रेड्डी यांनी व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर यवतमाळ जिल्हयातील किटकनाशकांच्या फवारणी दरम्यान मृत पावलेल्या शेतकऱ्यांचा परीवार तसेच जखमी झालेल्या शेतकऱ्यांनी सुध्दा या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### मोदी सरकार जबाबदार

**अनेक देशात बंदी असलेले किटकनाशक भारतात खुलेआम विकले जात आहे. या किटकनाशकामुळे दरवर्षी मोठया संख्येत शेतकऱ्यांचा मृत्यू होतो. हे सर्व माहित असतानाही भारतातील मोदी सरकार कुठलाही ठोस निर्णय घ्यायला तयार नाही. शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था असतानाही भारतातील शेतकऱ्यांच्या या दुरावस्थेला मोदी सरकार जबाबदार आहे. स्वीस सरकारने घेतलेला निर्णय बघून तरी केन्द्र सरकारने भारतातील पर्यावरन तसेच मनुष्याच्या रक्षणासाठी किटक नाशकाबाबत नविन निती तयार करणे गरजेचे वाटते.**

**देवानंद पवार**
**निमंत्रक, (एमएपीपीपी)**

# पंचायत समिती श्रीरामपूर सांस्कृतिक स्पर्धेत रज्जाक शेख प्रथम व कृष्णा हाळनोर द्वितीय

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवीवर्षानिमित्ताने सौमैय्या विद्यामंदिर सभागृहात संपन्न झालेल्या पंचायत समिती श्रीरामपूर प्राथमिक शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी आणि अधिकारी सांस्कृतिक स्पर्धेतील वैयक्तिक गीतगायन स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुरणपूर येथील कार्यरत प्राथमिक शिक्षक रज्जाक मजनुभाई शेख यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

त्यांनी सादर केलेल्या सामाजिक भान जपणाऱ्या व समाजप्रबोधन करणाऱ्या "मजला हवे तसे रे, सरकार माणसाचे" या स्वरचित आनंदकंद वृत्तातील गजलेला परीक्षकांनी प्रथम क्रमांक दिला. तसेच यावेळी झालेल्या इयत्ता पहिली ते चौथी लहान गटातील वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत कुरणपूर शाळेतील इयत्ता दुसरीतील कृष्णा संदीप हाळनोर या





विद्यार्थ्यांने स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा परिधान करून त्यांच्याविषयी अभिव्यक्त होऊन तालुक्यात दुसरा क्रमांक पटकावला. त्याच्या सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेनंतर सहाय्यक गटविकास अधिकारी शेख, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, प्राचार्य, मुख्याध्यापक सौमैय्या प्राथमिक विद्यामंदिर, केंद्रप्रमुख गायकवाड, परीक्षक गाडेकर, शेख, सूर्यभान वडीतके, राजेंद्र पंडित यांच्याहस्ते सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. दोघांच्या या यशाबद्दल परिसरातील मान्यवरांनी कौतुक केले आहे.



# लासूर बाजार समितीत कायमस्वरूपी कांदा खरेदी परवाना व जागा उपलब्ध करून द्या; शेतकऱ्यांची एकमुखी मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासुर स्टेशन कांदा बाजारात गेल्या दोन तीन दिवसापासून नियमित कांदा व्यापाऱ्यामार्फत सुरू असलेल्या दादागिरी, मनमानी, गोंधळामुळे लासुर स्टेशन बाजार समिती प्रशासनाने सर्व कांदा व्यापाऱ्यांचे परवाने १५ दिवसासाठी निलंबित केल्याबद्दल लासुरस्टेशन बाजार समिती व शिल्लेगाव पोलीस प्रशासनाचे शेतकऱ्यांच्यावतीने आभार म्हणून शेतकऱ्यांचा आनंदाचा उत्सव बैलपोळा तसेच सणासुदीच्या काळात कांदा बाजार १५ दिवस बंद राहणार असल्याने कांदा उत्पादक शेतकरी, हमाल, मापाडी यांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

कांदा हा नासवंत असल्याने १५ दिवस इतर बाजारात कांदा विक्रीसाठी नेताना पावसामुळे किंवा कमी भाव मिळाला तर कांदा उत्पादक शेतकरी यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे सर्व शेतकरी लासुरस्टेशन बाजार समितीत रितसर परवाना काढुन कायमस्वरूपी कांदा खरेदी करण्यास तयार आहेत. बाहेरून येणाऱ्या व शेतकऱ्यांना जास्तीच्या भावाने कांदा खरेदी करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांना सहकार्य करण्यास शेतकरी तयार आहेत. त्यामुळे लासुरस्टेशन कांदा बाजारात रितसर कांदा खरेदी करण्यासाठी परवाना व जागा उपलब्ध करून द्यावा, असे निवेदन शेतकऱ्यांनी दिले असून ज्या कांदा व्यापाऱ्यांची परवाने १५ दिवसासाठी निलंबित केलेली आहेत ती कायमची रद्द करून नविन व्यापार्यांना संरक्षण देण्यात यावे, असेही निवेदन देण्यात आले आहे.

सदर निवेदन इंजी महेश गुजर, अनिल पोळ (शंकरपुर), बाबासाहेब सोमासे (देर्हळ), दिगंबर गोटे (सिरेगाव), प्रविण आधाने (पिंपळगाव दिवशी), गणेश साळुंके (रायपुर), संदिप चव्हाण (धामोरी), प्रविण शिंदे (शहापुर), रामेश्वर जाधव (आपेगाव), किरण मोडे (लासुरस्टेशन), अविनाश सोनवणे (सिंदि शिरजगाव), शंकर सिरसाठ (गंगापूर), हमीद शेख (ममदपुर), मुस्ताक पटेल (प्रतापुरवाडी), नवनाथ बुट्टे (कनकसागज) आदी शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे.

# रखडलेली शासकीय भरती तत्काळ करा : प्रा.मदन डोखळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, डाभा येथील उपकेंद्र या मधे मोठ्या प्रमाणात जागा रिक्त आहे हे पदे भरण्यात यावे तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये जागा रिक्त असून, प्रत्येक विभागाला थांबलेल्या भरत्या तात्काळ करण्याची मागणी प्रा. मदन डोखळे (सामाजिक कार्यकर्ते) यांनी केली आहे.

याबाबत निवेदनात म्हटले की, कोणाच्या पार्श्वभूमीवर मागील तीन वर्षापासून शासकीय नोकरीसाठी कोणत्याही प्रकारची जाहिरात प्रसिद्ध झाली नसून, थांबलेल्या विविध शासकीय



विभागातील जिल्हा परिषद, गृह विभाग, पशुसंवर्धन विभाग, नगरपालिका, आरोग्य विभाग, तसेच एम.पी.एस.सी मधील नोकर भरती सुरू करण्याची मागणी करीत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या अर्जावर विचार करून रखडलेल्या शासकीय विभागातील भरत्या तात्काळ कराल अशी आशा व्यक्त करतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ता प्रा.मदनभाऊ डोखळे डाभा ता.सोयगाव यांनी केली आहे.

# मूल्य साखळी विकास योजने अंतर्गत शेतीशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील निमखेडी येथे दि.25 रोजी राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकास योजने अंतर्गत कापूस पिकाची शेतीशाळा घेण्यात आली. सदर शेती शाळेत संभाजी पाटील कृषी सहायक यांनी गुलाबी बोंड अळी नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले. सोबत प्रवीण वाघ कृ.स. यांनी कीटकनाशके फवारणी करताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत प्रात्यक्षिक घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी सदर शेतीशाळेला उस्फूर्त प्रतिसाद दिला. तालुका कृषी अधिकारी संपत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण तालुक्यात पिक संरक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. एकात्मिक अन्न द्रव्ये व्यवस्थापण आणि कीड रोग व्यवस्था याविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली.

कामगंध सापळे वापर याविषयी प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. तसेच उपस्थित शेतकरी बांधवाना प्रोफेनोफास या किटकनाशकाचे वाटप करण्यात आले. सदर शेतीशाळेला कृषी सहाय्यक प्रवीण वाघ व संभाजी पाटील आणि गावातील प्रगतिशील शेतकरी वर्ग व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# तहसिलदार संजय वारकड यांनी दिले तलाठ्यांना मोजणीचे पत्र

## अवैध गौण खनिजप्रकरणी आधुनिक केसरीच्या बातमीचा दणका; पेट्रोलपंप मालकाकडून महसूल प्रशासनाची दिशाभूल

आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** येथील 'दिवसाढवळ्या डोंगर पोखरून होत आहे गौण खनिजाची लुट' या मथळ्यावर दैनिक आधुनिक केसरीमध्ये बातमी प्रसिध्द झाल्याने कन्नड तहसीलदार संजय वारकड यांनी बातमीची दखल घेत तलाठी यांना मोजणीचे पत्र दिले आहे. कन्नड येथे नविन पेट्रोलपंप मंजुर झाले असून त्यांच्या निकशाप्रमाणे कामे जोरात सुरू आहे हेच पेट्रोल पंपाचे मालक महसुल प्रशासनाची दिशाभुल करून लाखो रुपयाची फसवणुक करताना चर्चेला उधाण येत आहे. महामार्ग लगत व्यवसायासाठी व पेट्रोल पंपासाठी मोठया प्रमाणात भरती लागते हे सर्वानाच ठाऊक आहे.
मात्र, दिवसाढवळ्या डोंगर पोखरून नदी, नाले, धरणे, पाझर तलाव, गायरान, पडीत जमिन इत्यादी ठिकाणाहून गौण खनिजाची पन्नास-शंभर ब्रास परवानगी घेऊन शेकडो ब्रास गौण खनिजाची चोरी करताना दिसून येत आहे.
परवानगी एका जागेची मात्र उत्खनन दुसऱ्याच ठिकाणी यात राजकीय लोकपण आपली पोळी भाजुन घेत आहे. शेतीसाठी गाळपेराची परवानगी घेऊन महामार्गालगत भरती करत आहेत.
कन्नड शहरालगत पिशोर रोड, अंधानेर फाटा, अंबाडी प्रकल्प जवळ, तेलवाडी जवळ, साखर कारखान्याच्या पाठीमागे अश्या ठिकाणी नविन सुरू होणारा पेट्रोल पंपाच्या


दिवसाढवळ्या डोंगर पोखरून होत आहे गौण खनिजाची लूट
पेट्रोलपंप मालकाकडून महसूल प्रशासनाची दिशाभूल; लाखो रुपयांची फसवणूक; प्रशासन मात्र गप्प

रितसर परवानगी घेऊन ती परवानगी कामाच्या ठिकाणी ठेवावी लागती. संबधीत बहुतेक कमी ब्रासचे चलन काढुन शेकडो ब्रासचे उत्खनन करून भरती करून लाखो रूपयाचा महसुल बुडवत आहे, असे चर्चेला उधाण आले आहे.
शेकडो ब्रास गौण खनिजावर डल्ला मारण्याचे काम सुरू असून यामुळे महसुल विभागाची फसवणुक होत आहे का ? महसुल विभागातील

भरतीसाठी सर्सास उत्खनन सुरू आहे. मात्र यात महसुल विभागाचा लाखो रूपयाचा महसुल बुडविताना दिसुन येत आहे. सदरील पंप चालकाकडे जर उत्खनन परवानगी आहे मग ते दाखवत का नाही? काहींकडे फक्त बँकेत भरलेल्या चलनच आहे ते ही फक्त पन्नास ते शंभर ब्रासची असून मात्र सुमारे पाचशे ते आठशे ब्रास उत्खनन केलेले मुरूमाची भरती करताना दिसून येत आहे. उत्खननासाठी परवानगी एका जागेची मात्र उत्खनन करतात दुसऱ्या ठिकाणी असाही प्रकार समोर येत आहे. बँकेत चलन भरल्यानंतर महसुल विभागाची

काही अधिकारी कर्मचारी सामील तर नाही ना ? यात नेमक गौड बंगाल तरी काय आहे ? असे अनेक प्रश्न पडले आहे. अश्या गौण खनिजाची लुट करणाऱ्यावर महसुल प्रशासन व गौण खनिज विभाग औरंगाबाद लक्ष देणार का ? अवैध गौण खनिजाची चोरी करून भरती करून महसुल बुडविला आहे, अश्या जागेवर जाऊन प्रत्यक्षात स्थळ पंचनामा व मोजमाप केले तर सत्य बाहेर येईल व दुध का दुध पाणी का पाणी होईल? सतत असे सुरू राहिले तर तालुक्यातील सौदर्य नामशेष झाल्याशिवाय राहणार नाही जर अश्या गौण खनिज लुटणाऱ्यांवर महसुल विभागाचा कानाडोळा तर होत नाही ना? गौण खनिज लुटणाऱ्यांना असेच खतपाणी मिळत राहील तर तालुक्याचे निसर्ग सौदर्य निस्त नाबुत झाल्याशिवाय राहणार नाही यावर कन्नड महसुल प्रशासन व गौणखनिज विभाग औरंगाबाद काय कारवाई करतात याकडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### तहसिदारांनी दिले तपासाचे आदेश

**दरम्यान, तहसिलदार संजय वारकड यांनी तलाठी यांना पत्र काढले. त्यात लिहिले आहे की, तलाठी सज्जा कन्नड व तलाठी सज्जा अंधानेर अंतर्गत मौजे कारखाना, रेल, मालपुर, कन्नड शहर, अंधानेर, तेलवाडी, लंगडा तांडा इत्यादी गावातील महामार्ग लगत कमी प्रमाण दर्शवून जास्त प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन व वापर झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. त्या अनुषंगाने आपले सज्जा अंतर्गत किती पेट्रोल पंप धारक आहेत व किती लोकांनी अवैध भरती केली आहे. त्याची खनिजापोटी किती ब्रास रॉयल्टी भरणा केलेली आहे. एकूण कामावर दगड, माती, मुरूमाचा वापर झाला आहे, याची कामावर जाऊन एटीएस मोजणी करावी व याची माहिती तात्काळ कार्यालयात सादर करावी, असे पत्र तहसीलदार संजय वारकड यांनी तलाठी यांना दिलेले आहे. आता कुणाला किती दंड होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# खंडित केलेला वीजपुरवठा परस्पर जोडल्यास गुन्हा दाखल होणार : नीरज बिदे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात ३३ केव्ही उपकेंद्र महावितरणच्या थकबाकी वसुली मोहिमेला सावळदबारा परिसरात सुरुवात झाली आहे. गावात थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला तर वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांचे मीटर व सर्व्हिस वायर काढून घेण्यात येत आहे. थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केल्यानंतर ग्राहकाने परस्पर किंवा शेजाऱ्यांकडून वीजपुरवठा घेतल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा महावितरणचे उप कार्यकारी अभियंता निरज बिदे व सहाय्यक अभियंता योगेश जाधव यांनी दिला आहे.
काही ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला. ग्राहकांकडून वीजबिल भरून घेण्यात येत आहे. तर काही वीजचोरांवर कारवाई करणे चालू आहे. दरम्यान, या मोहिमेत थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केल्यानंतर संबंधित वीजजोडण्यांची स्वतंत्र पथकांद्वारे पडताळणी सुरू आहे. तसेच या वीजजोडण्यांची सायंकाळनंतरदेखील विशेष तपासणी करण्यात येईल. या दोहोंमध्ये शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून वायर किंवा केबलद्वारे विजेचा वापर आढळल्यास शेजारी व वीज वापरणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५/१३८ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. सोबतच थकीत बिलाची रक्कम किती आहे हे न पाहता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे.
घरबसल्या वीजबिल भरण्यासाठी लघुदाब वर्गवारीतील सर्व वीजग्राहकांना www.mahadiscom.in वेबसाईट व मोबाईल ॲपद्वारे 'ऑनलाईन' सोय उपलब्ध आहे. घरगुती ग्राहकांचे वीजबिल १० हजार रुपयांपेक्षा अधिक असल्यास त्यांना 'आरटीजीएस' किंवा 'एनईएफटी' द्वारे थेट वीजबिल भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येत आहे. ग्राहकांनी वीजबिल भरून सावळदबारा ३३ केव्ही उपकेंद्र महावितरणला सहकार्य करण्याचे आवाहन निरज बिदे उपकार्यकारी अभियंता सोयगाव व योगेश जाधव सहाय्यक अभियंता सावळदबारा महावितरणने केले आहे.

# पैठणमध्ये प्रारब्ध फाउंडेशनची दहीहंडी उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरात प्रारब्ध फाऊन्डेशनची दहीहंडी उत्साहात साजरी करण्यात आली. एका वर एक मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकातील चढाओढ, ठेका धरायला लावणारा संगीताचा ठेका, सोबतीला अकर्षक रोषणाईचा सहवास आणि क्षणाक्षणाला वाढणारी उत्कंठा अशा जल्लोषी वातावरणात तब्बल तीन तास प्रारब्धच्या दहीहंडीचा थरार रंगला. पाचमानवी मनोरे आणि त्यावर डबल एक्काचा (एकावर एक गोविंदा) अशा पध्दतीने रचना करत बिडकीनच्या जनसेवा मंडळाने दहीहंडी फोडली अन् २२ हजार रुपयांचे बक्षीस जिंकले.
छत्रपती शिवाजी महाराज परिसरातील राजपुत्र भवन पटागंणात गुरुवारी रात्री पैठणमध्ये दहीहंडीचा थरार अनुभवण्यासाठी हजारोंच्या संख्येने गर्दी लोटली होती. डीजेचा ठेका आणि गोविंदा रे गोपाळाच्या तालावर तरुणाई थिरकली. हजारो पैठणकर रसिकांनी लुटला या उत्सवाचा मनमुराद आनंद. मंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रेरणेने विलासबापू भुमरे यांच्या उपस्थितीत आयोजक "प्रारब्ध" चे अध्यक्ष शिवराज पारीख यांनी दहिहंडीचे आयोजन केले होते. शेखर शिंदे, नामदेव खराद, सचिन उंडाळे, किशोर चौधरी, जनार्दन मिटकर यांच्यासह मान्यवरांनी प्रमुख उपस्थिती लावली.
दहीहंडी स्पर्धेत सहभागी गोविंदा पथकांनी चार थरांची सलामी दिल्यानंतर सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास प्रत्यक्ष स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी सात गोविंदा पथकांनी या फेरीत सहभाग नोंदवत चार थर रचले. मात्र दहीहंडी फोडण्यात ते अपयशी ठरले. सहभागी संघांमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी पुन्हा एकदा कमालीची चढाओढ पाहावयास मिळाली. यामध्ये बिडकीनच्या सुजित भाऊ युवा मंच मंडळाने जिगरबाज वृत्तीचे दर्शन घडवित



काही मिनिटातच पाच थर रचले. वरच्या थरावरील गोविंदाने दहीहंडी फोडताच मैदानात एकच जल्लोष सुरू झाला. त्यांना विलासबापु भुमरे यांच्या हस्ते सहा फुटाची ट्रॉफी व बक्षीस वितरण करण्यात आले. दहीहंडी उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रारब्ध फाऊन्डेशन चे सदस्य महेश लोळगे, यश राजपूत, पवन बचाटे, संदेश मुथा, विजय जाधव, कृष्णा तावरे, प्रसाद सेवनकर, नितेश टाक, शिवशंकर वाजे इत्यादी सर्वांनी परिश्रम घेतले.




# शहरातील रस्ते चोरीला जाण्याआधी खड्डे बुजवा


## रस्ते चोरांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्याची किरण जोंधळे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील कॉलनी परिसरासह 11 समाविष्ट गावे व प्रमुख रस्ते खड्डेमय झाले आहेत. गणेशोत्सव व येणाऱ्या सणांच्या काळात नागरिकांची छोट्या मोठ्या अपघातातून सुटका व्हावी या करीता गणेशोत्सवा आधी संपुर्ण शहरातील खड्डेमय रस्त्याची डागडुजी युध्दपातळीवर करणे गरजेचे आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे रस्त्यांचे अस्तित्व व त्यांची ओळख संपल्यात जमा आहे. त्यामुळे शहरात रस्ते चोरी करणारी टोळी सक्रिय झाली आहे. बडगुजर प्लॉट या भागात तीन महिन्यांपूर्वी तयार झालेला रस्ता आणि 8 दिवसांपुर्वी ज्याचे 22 लाखांचे बील प्रशासनाने दिले तो रस्ता चोरीला गेला असल्याचे स्थायी समितीत एका सदस्याने आपल्या निर्दशनास आणुन दिले.
याबाबत वर्तमानपत्रात देखील मोठमोठ्या बातम्या झळकल्या. 22 लाखांचे बील देवुन पुर्ण झालेला रस्ता, तो परत कोणी खोदला? तो रस्ता खरच बनला होता की तो न बनविता बिल काढले गेले? यात कोणाकोणाचा सहभाग आहे, हे धुळेकरांसमोर यायला हवे, आयुक्त अशा प्रकारे धुळे शहरातील रस्ते चोरीला जायला लागले तर आता आपल्याला शहरात स्कायवॉक धर्तीवर आकाशात तरंगणारे रस्ते बनवावे लागतील, त्यासाठी आपण आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, शिवसेना देखील याकामी आपल्याला सहकार्य करेल असे जिल्हा प्रमुख किरण जोंधळे यांनी सांगितले. संपुर्ण धुळे शहरातील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून खड्ड्यामुळे त्रस्त झाले आहेत. देवपुर, पेठभाग कॉलनी परिसर येथे एकही रस्ता असा नाही की ज्यावर खड्डे नाहीत. एकीकडे मनपा प्रशासन मालमत्ता कर व इतर करात भरमसाठ वाढ करून धुळेकरांना लुटते आहे. नागरिकांना त्यांच्या मुलभुत सुविधा पुरविण्यात मनपा अपयशी ठरली आहे. आता नागरिकांनी किती दिवस हाल, अपेष्टा सोसायच्या हा प्रश्न धुळेकरांच्या मनात आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे अनेक नागरिकांना छोट्या मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागत असून काहींना त्यामुळे कायमचे अपंगत्व देखील आले आहे. या निवेदनामध्ये असे सुचित केले की गणेशोत्सवाआधी शहरातील सर्वच रस्त्यांची डागडुजी पुर्ण करावी, तसेच आज एक रस्ता चोरीला गेला आहे, उद्या अनेक रस्ते चोरीला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्ते चोरणाऱ्या भुरट्यांवर गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, असे या निवेदनात म्हटले.

# पेन्शन योजने संदर्भात पंतप्रधान मोदी यांना समविचारी पक्ष संघटनेच्या वतीने निवेदन

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** 20 वर्षापासून ईपीएस पेन्शन योजनेत नाममात्र 800 ते 2000 पर्यंत 187 उद्योग व असंघटित क्षेत्रातील निवृत्त कर्मचारी यांना दिले जाते. वेळोवेळी निवेदन, आंदोलने केली असून कामगार न्यायालयानेसुध्दा सुधारीतपणे 9 हजार पर्यंत पेन्शन देण्याचे आदेशित केले, मात्र केंद्र सरकार याकडे लक्ष देत नाही. श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजनेत सुध्दा 1000 रू. मदत दिली जाते, मात्र 35/40 वर्ष खाजगी नोकरी करून निवृत्त कर्मचाऱ्यास 800-2000 रूपये पेन्शन यात महिन्याचे रेशन सुध्दा येत नाही, म्हणुन न्यायालयाचे निकालाप्रमाणे 9000 रूपये पेन्शन महागाई व आरोग्य सुविधा देण्याबाबत आज दि.25 रोजी एक दिवसाचे धरणे आंदोलन करून जिल्हाधिकारी मार्फत कॉ. पोपटराव चौधरी यांचे नेतृत्वाखाली निवेदन दिले. त्यावेळी कॉ. एल.आर. राव, कॉ. वसंत पाटील, कॉ. दिपक सोनवणे, सचिन पारोळेकर, हरिचंद्र लोंढे, प्रभाकर खंडारे, कॉ. प्रमोद सिसोदे, कॉ. प्रशांत वाणी, हुसेन बेग, नवल ठाकरे, बी.एस. पाटील, कादर बेग आदी उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मराठवाड्याचा स्वातंत्र्योत्सव; या दिनाची जाहिरात वृत्तपत्रांना द्या

## पीसीएमची मुख्यमंत्री, माहिती व जनसंपर्कमंत्री यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन 17 सप्टेंबर रोजी मराठवाड्यात साजरा करण्यात येतो. हा दिवस मराठवाड्याचा स्वातंत्र्य दिवस आहे. याबाबीचा विचार करून मराठवाड्यातील वृत्तपत्रांना या दिनाची जाहिरात देण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री व माहिती व जनसंपर्क मंत्री यांच्याकडे प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन 17 सप्टेंबर रोजी मराठवाड्यात साजरा करण्यात येतो. भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी 562 संस्थाने ही भारतात विलीन झाली मात्र, निजामांचे राज्य असलेल्या हैद्राबाद संस्थान (मराठवाडा, तेलंगणा व कर्नाटकचा काही भाग) भारतात विलीन झाले नव्हते. निजामांच्या राज्यातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ, दिंगबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजयेंद्ग काबरा, बाबासाहेब परांजपे, दगडाबाई शेळके, जनार्दन मामा, विठ्ठलराव काटकर, सुर्यभान पवार, किशनसिंग राजपूत, गोविंदराव पानसरे यांच्यासह अनेकांनी यासाठी लढा दिला.

भारताचे तत्कालीन गृहमंत्री लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पोलीस कारवाईनंतर 17 सप्टेंबर 1948 रोजी निजामांच्या तावडीतून सुटका झाली व त्यादिवशीपासून मराठवाड्यात स्वातंत्र्य उत्सव साजरा करण्यात येतो. 17 सप्टेंबर रोजी मराठवाड्यात तिरंगा ध्वज फडकवला जातो. विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. हा दिवस मराठवाड्याचा स्वातंत्र्य दिन आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करण्याहेतू मराठवाड्यातील शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या व यादीत सामाविष्ट नसलेल्या मागणी करणाऱ्या वृत्तपत्रांना 17 सप्टेंबर 2022 रोजीची जाहीरात देण्यात यावी व ही जाहीरात मराठवाड्यातील वृत्तपत्रांना दरवर्षी 17 सप्टेंबर रोजी देण्यासंबंधी निर्णय घेण्यात यावा, अशी मागणीही शेळके यांनी केली आहे.

### मागणी अर्ज करा : शेळके



**मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जाहिरात मिळावी याकरीता महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय यांच्याकडे जिल्हा माहिती अधिकारी यांच्यामार्फत मराठवाड्यातील वृत्तपत्रांनी जाहिरात मागणी अर्ज करावा, असे आवाहन प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी केले आहे.**

# शशिकांत कुलथे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा दामू तांडा ता.गेवराई येथे कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक शशिकांत कुलथे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

येत्या 5 सप्टेंबर शिक्षकदिनी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर कार्य केलेल्या शिक्षकांना गौरविण्यात येणार आहे.

विद्यार्थीप्रिय, गुणवत्तापूर्ण, आणि शिस्तबद्ध कार्य या आधारावर त्यांची निवड करण्यात आली आहे. शशिकांत कुलथे यांनी दामू नाईक तांडा शाळेत समाज सहभागातून विविध शैक्षणिक उपक्रम विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन केले आणि यातूनच त्यांचे कर्तृत्व सिद्ध होत गेले. विद्यार्थी ज्ञानार्जनाबरोबरच त्यांची मनाची जिद्द, चिकाटी आणि तळमळ त्यांच्या कार्यातून सतत दिसून येत आहे. याआधी राष्ट्रीय, राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, केंद्र स्तरावर 42 हून अधिक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. विविध विषयांवरील सात पुस्तकांचे त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# खबरदार... वनहद्दीत अतिक्रमण केले तर होणार कडक कार्यवाही : सचिन शिंदे

## अतिक्रमण करणाऱ्या चार आरोपींना अटक; तालुक्यातील कळंकी गावातील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**पिशोर :** वनविभागाने अतिक्रमण निष्काशीत केलेल्या जमिनीवर पेरणी केल्याने गुन्हा दाखल करून 4 आरोपींना अटक करण्यात आली असून कोणीही वनहद्दीत अतिक्रमण केल्यास त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती वनविभागाने दिली आहे.

कन्नड प्रादेशिक वनपरिक्षेत्र अंतर्गत कळंकी वन परिमंडळ मधील कळकी पूर्व नियतक्षेत्रात कक्ष क्रमांक 123, गट नंबर 164 मधील वनविभागाने राखीव वनातील अतिक्रमण निष्काशीत केलेल्या वनविभागाच्या ताब्यात असणाऱ्या वन जमिनीवर बेकायदेशीररित्या अपप्रवेश करून पिकांची पेरणी केल्याने वडनेर येथील रहिवाशी असलेले दयाराम उत्तम राठोड, शिवराम उत्तम राठोड, अनिल उत्तम राठोड, ज्ञानेश्वर उत्तम राठोड इत्यादी आरोपींवर भारतीय वन अधिनियम 1927 च्या कलम 26 (1) ए डि एच, 26 (4) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपींना अटक करून दि.24 ऑगस्ट 2022 रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कन्नड यांच्या समक्ष हजर केले असता प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड यांनी पुढील चौकशीसाठी सदर आरोपींना एक दिवसाची वन कोठडी सुनावली आहे. तसेच सदर गुन्ह्याचा पुढील तपास वनपाल सी.एम. महाजन करत आहेत. वरील कार्यवाही उपवनसंरक्षक प्रा. औरंगाबाद वनविभाग सूर्यकांत मंकावार यांचे प्रमुख मार्गदर्शनात सहाय्यक वनसंरक्षक कन्नड सचिन शिंदे यांचे व वनपरिक्षेत्र अधिकारी रोहिणी साळुंखे यांचे नेतृत्वात पार पडण्यात आली आहे. तसेच वन विभागाने माहिती दिली आहे की, वनहद्द पहिलेच स्थापित केली आहे, तरी काही लोक जाणूनबुजून अतिक्रमण करण्याच्या प्रयत्न करीत आहे, मात्र असे केल्यास कायदेशीर कार्यवाही करायला भाग पडावे लागत आहे. परिसरात नागरिकांनी विनाकारण अतिक्रमण करू नये, कायदे भंग करु नये, असे कृत्य केल्यास कोणाचीही गय न करता कड़क कार्यवाही करून तुरुंगाची हवा खावी लागेल, अशी माहिती वनविभागाने दिली आहे.



# ज्येष्ठ नागरिकांनी अनुभवले भीमाशंकरचे धार्मिक पर्यटन


आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पिंपळे सौदागर परिसरातील साई पर्ल सोसायटीमधील जेष्ठ नागरिकांनी श्रावण महिन्याचे औचित्य साधत भीमाशंकर येथे जाऊन धार्मिक पर्यटनाची नुकतीच अनुभूती घेतली.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याजवळील भीमाशंकर येथे आयोजित एक दिवसीय सहलीमध्ये बासस्ट ते बहात्तर या वयोगटातील राजेश गुप्ता, ओमप्रकाश दासाणी, बी.एल. अहिरे, एस.एम. माने, पी.पी. चौधरी, दिपू सेठ, निकेश कुमार, अरविंद पाटील, कमलेश सहा, बाळासाहेब काटे, अनिल कुलकर्णी, नांदगावकर, विनोद कुमार, भीरुड, मेघानी, फुलवाले, देशमुख, कांबळे, राऊत, चौधरी या जेष्ठ नागरिकांनी सामील होत भीमाशंकर परिसरातील देवदेवतांच्या दर्शनासोबतच डोंगराच्या पार्श्वभूमीवर हिरवाईने नटलेल्या निसर्गाचाही आनंद लुटला. उत्साहात पार पडलेल्या या सहलीमध्ये भोजन तसेच दर्शन व्यवस्थापनाची जबाबदारी कांबळे, नांदगावकर, मेघानी आणि दिपू सेठ यांनी सांभाळली तर एस.एम. माने, कुलकर्णी यांनी करावके सिस्टीमवर जुन्या चित्रपटातील सदाबहार गाणी सादर करीत उपस्थितांचे मनोरंजन केले.



# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हार्मोन्स - पुरुष आणि स्त्री...

आधुनिक केसरी

**5) इस्ट्रोजन :** MC रेग्युलेशन, फीमेल सेक्स ऑर्गन्स, गर्भाशयाची म्युकोसल वाढ करणे हे कार्य करते. पाळी बंद झाल्यानंतर (मेनोपॉज) इस्ट्रोजन अतिशय कमी होते व पाळी बंद होते. योनीअंग कोरडे होणे, पेन होणे, झोप आणि मूड यावर याचा परिणाम होतो.

**6) DHEA (एक्झायटेशन हार्मोन) :** यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेली अण्ड्रोजन स्त्रियांमध्ये उत्तेजना, भावना तयार करण्याचे महत्त्वाचे काम करतात.

**7) टेस्टोस्टेरोन :** सेक्स ड्राईव्ह तयार करणे, डोपॅमीन, इपीनेफरीन व वासोप्नेसीन तयार करणे, सिरोटोनीन, ओपीऑईड व प्रोलॅक्टीनची मात्रा कमी करणे. ही कामं हे हार्मोन करते.

**8) हायपोगोनॅडिझम :** ३०० नॅनोग्रॅम प्रति डेसीने वाढलेल्या मात्रा यामुळे स्त्रियांमध्ये अनियमित पाळी, शरीरावर केस येण आवाजात बदल होणे, PCOD अशा समस्या उद्‌भवतात.

**9) वासोप्रेसीन :** कामभावना तयार करणे त्यावर लक्ष केंद्रित करणे हे यामुळे घडते. हृदय हे सुद्धा एक छोटं ब्रेन आहे.

**10) PEA (फिनाईलइथेनालामाईन) :** प्रेमात पडलं की में काम करत नाही असं म्हणतात. यात हार्मोन्सचा काही रोल आहे का ? तर होय. प्रेमात पडलेले, ते जवळ आल्यानंतर तळहाताला घाम येणे, श्वास वाढणे, वैचारिक शक्ती बदलणे, पोटात गुदगुल्या होणे अशा क्रिया घडू लागतात. फक्त प्रेयसीच्या नजरेला नजर दिली किंवा हाताचा स्पर्श झाला किंवा उत्साहवर्धक संगीत, पुस्तक वाचलं तरीही या भावना तयार होतात. PEA हे एक नैसर्गिक केमिकल असून, ते लव-मॉलिक्युल्सन तयार करते आणि हे सगळं न्यूरो ट्रान्समीटर्सच्या माध्यमातून नॉरश्पीनेफरीन, इपी नेफरीन, सिरोटोनीन, PEA, डोपॅमीन आणि विटामीन - B6 मुळे हे तयार होते. PEAR900 - डोपॅमीन आणि नॉर इपीनेफरीन हे उत्तेजना व ईच्छा तयार करते.

**(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# औरंगाबाद ऑलिम्पिक असोसिएशनच्या वतीने राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** ऑलिम्पिक असोसिएशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार सोहळा यावर्षी २८ ऑगस्ट रविवारी संत एकनाथ रंगमंदिर येथे सकाळी ९:३० वाजता आयोजित केलेला असून सर्व पुरस्कार्थी खेळाडूंनी व विविध खेळ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी याची नोंद घेऊन आपल्या खेळाच्या खेळाडूंना वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन औरंगाबाद ऑलिम्पिक अस्सोसिएशन अध्यक्ष पंकज भारसाखळे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री अतुल सावे तसेच ऑलिंपियन व अर्जुन पुरस्कार्थी दत्तू भोकनाल हे उपस्थित राहणार असून यांच्या शुभहस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती पंकज भारसाखळे, अध्यक्ष, औरंगाबाद ऑलिम्पिक अस्सोसिएशन यांनी दिली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in